# प्रकरण - २

## महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती

## प्रकरण दुसरे

# महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती

शिक्षण शेत्रातील कर्मवीरांच्या कर्मयोगाची साक्ष म्हणजे रयत शिक्षण संस्था. हजारो वर्षे दबलेल्या बहुजन समाजाच्या अंत:करणात आत्मविश्वासाची निर्मिती रयत शिक्षण संस्थेने केली. हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील संस्थेचे सर्वात मोठे कार्य होय. रयत शिक्षण संस्थेचा चिमुकला प्रारंभ आणि तिचे आजचे डोळे दिपविणारे प्रचंड स्वरूप पाहिले की वटवृक्ष हे तिचे बोधचिन्ह सार्थ वाटू लागते. या वटवृक्षाची एक शाखा म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय होय. रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार हे महाविद्यालय कार्यरत आहे. आज राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय प्रगतीच्या दिशेचे वाटचाल करीत आहे. या महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**महाविद्यालयाची सुरवातीच्या काळातील विद्यार्थी संख्या -**

प्राचार्य डॉ. उषा इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली किर्ती महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाला. पहिल्या वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीची संख्या ६२ एवढी होती. कॉलेजच्या पहिल्या वर्षीचा निकाल ७७ टक्के होता. शिवाय मराठीचे प्राध्यापक श्री वा. पा. गिंडे यांचे परिश्रमामुळे मराठीच्या विषयासाठी 'करमकर पारितोषिक' विद्यार्थीनी कु. उषा कुलकर्णी हिला मिळाला.[१] मुलींसाठी गृहशास्त्राचे शिक्षण हे या महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्ये होय. दक्षिण महाराष्ट्रातील खास स्त्रियांचे असे हे एकमेव कॉलेज निघाल्यामुळे आसपासच्या बऱ्याच विद्यार्थीनींची कॉलेज शिक्षणाची सोय झाली. १९६३ पासून हक्काने आणि कायद्याने हे कॉलेज शिवाजी विद्यापीठाशी संलग्न झाले आणि विद्यापीठाच्या नियमानुसार कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनींबरोबर विद्यार्थ्यांनाही प्रवेश देण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचा अभ्यासक्रमही लागू झाला.[२]

अपूर्णतेच्या जाणीवेने व पुर्णतेच्या ओढीने होणारे विकसन हा जसा ज्ञानाचा तसा ज्ञान संस्थांचाही विशेष आहे. प्रतिवर्षी वाढत गेलेली विद्यार्थी संख्या याची साक्ष देते. सुरवातीच्या काळातील विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे होती.[३]

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९६१ | ६२ |
| १९६२ | ८६ |
| १९६३ | ११० |
| १९६४ | १५६ |
| १९६५ | १८९ |
| १९६६ | २०५ |
| १९६७ | २४७ |
| १९६८ | ३१५ |
| १९६९ | ४६० |
| १९७० | ५६० |
| १९७१ | ७०० |

विद्यार्थी संख्या प्रतिवर्षी वाढत गेलेली दिसते. या महाविद्यालयाने समाजाच्या ज्या पिढीला ज्ञान समुख करावयाचे त्याविषयी महाविद्यालयाचे असे काही निश्चित उद्दिष्ट आहे. या महाविद्यालयातून मागासलेल्या दलित व उपेक्षित अशा विद्यार्थी विद्यार्थीनींचा विकास व्हावा अशी अपेक्षा होती. कर्मवीर आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेने हे व्रत पत्करले होते. समाजातील उपेक्षित वर्गापर्यंत ज्ञानगंगा नेण्याचा हा कर्मवीरांचा वसा महाविद्यालय, निष्ठापूर्वक सांभाळीत आहे.[४]

**शैक्षणिक धोरण -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय आहे. रयत शिक्षण संस्थेची स्थापना सन १९१९ मध्ये झाली असली तरी संस्थेचे रजिस्ट्रेशन सन १९३५ साली झाले. सन १९३५ पर्यंत संस्थेची लिखित घटना नव्हती. १९३५ मध्ये लिखित घटना तयार करून १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली संस्था नोंदवली गेली. पुढे १९५० व्या पब्लिक ट्रस्टस ॲक्टखाली या संस्थेची नोंदणी झाली आहे. सन १९८० अखेर वेळोवेळी संस्थेच्या घटनेमध्ये कालमानास अनुसरून व संस्थेच्या वाढत्या शैक्षणिक कार्याला उपयुक्त अशा दुरूस्त्या करण्यात आलेल्या आहेत.[५]

वेळोवेळी घटनेमध्ये दुरूस्त्या झालेल्या आहेत. त्यावरून एक लक्षात येईल की संस्थेने आपली घटना पुरेशी लवचिक बनविलेली आहे. कालमानास अनुसरून व संस्थेच्या शैक्षणिक कार्यासाठी आवश्यक अशा दुरूस्त्या संस्थेच्या घटनेमध्ये वेळोवेळी झालेल्या आहेत. तसेच संस्थेच्या सेवकांना कारभारात प्रतिनिधित्त्व देण्यात आलेले आहे.

संस्थेच्या अद्ययावत घटनेनुसार संस्थांची ध्येयधोरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील भावी पिढ्यांना पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देणे. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक, शेतीविषयक, व्यापार विषयक, औद्योगिक व शरीरसंवर्धनात्मक बाबींचा समावेश असेल.

२) या कार्यासाठी आवश्यक असा शिक्षक वर्ग तयार करणे.

३) ग्रामीण उद्योगधंदे व ग्रामीण पुर्नरचना या कामासाठी ग्रामीण कार्यकर्ते तयार करणे.

४) या ध्येयधोरणांच्या पुर्ततेसाठी परिस्थितीनुरूप विद्यालये, महाविद्यालये, वसतिगृहे, ग्रंथालये, वाचनालये इ. सुरू करणे.

५) याकामी सर्व कायदेशीर बाबींचो पूर्तता करणे.

६) स्वावलंबी शिक्षण शक्य व्हावे यासाठी सर्व सुविधा निर्माण करण्यात येतील.

७) शिक्षण शक्य तेवढे मोफत राहील.

८) संस्था व तिच्या सर्व शाखा जात, गोत, धर्म, पंथ यावर आधारित भेदभावापासून अलिप्त राहतील.

९) संस्था राजकारणानुसार अलिप्त राहील.[६]

संस्थेच्या ध्येयधोरणानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे. १९७१ साली हे महाविद्यालय स्वतःच्या जागेमध्ये विचारे माळ, कदमवाडी येथ स्थलांतरीत झाले. महाविद्यालयाच्या प्रस्तावित जागेसमोर अवैधरित्या उभारलेली झोपडपट्टी होती. जवळच मोठ्या जनावरांचा कत्तलखाना होता. तरीही संस्थेने व महाविद्यालय प्रशासनाने जागेची गरज लक्षात घेऊन आजूबाजूच्या गलिच्छ वातावरणाकडे दुर्लक्ष करून तेथेच आपले शैक्षणिक कार्य सुरू करण्याचा निर्णय घेतला. सामाजिक बांधिलकीचे तत्त्व स्विकारून झोपडपट्टीतील मुलांना शाळा महाविद्यालयात पाठविण्यासाठी प्रोत्साहन देणे. दलित वस्तीमध्ये स्वच्छता व प्रबोधनाचे कार्यक्रम घेणे अशा विविध उपायांच्या माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिसराशी असलेली नाळ घट्ट करण्याचा प्रयत्न केला. या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) आशिया खंडातील सर्वात मोठ्या आणि नामवंत अशा रयत शिक्षण संस्थेचे कोल्हापूरातील एकमेव महाविद्यालय.

२) या महाविद्यालयाला उज्ज्वल निकालाची परंपरा.

३) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने ओळखले जाणारे हे महाविद्यालय त्यांचे जिवंत स्मारकच आहे.

४) ४५ वर्षाची यशस्वी वाटचाल प्रशस्त व भव्य इमारत.

५) बॅडमिंटनची सोय असणारे बहुउद्देशिय सभागृह.

६) उच्च विद्याविभूषित, प्रशिक्षित व सेवाभावी अध्यापक, कार्यतत्पर, प्रशासकीय सेवक व ज्ञानमग्न विद्यार्थी.

७) अकरावीपासून पदवीपर्यंत कला, वाणिज्य, विज्ञान या विद्या शाखांमधील शिक्षणाची सोय. त्याचबरोबर व्यवसाय शिक्षण ही उपलब्ध. बी.ए.भाग ३ साठी मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व शारिरीक शिक्षण, बी.कॉम. भाग ३ साठी अकौंटन्सी व बँकींग, तर बी.एस्सी भाग ३ साठी रसायनशास्त्र या स्पेशल विषयाची सोय सरकारमान्य एम.एस.सी.आय.टी. या कॉम्प्युटर कोर्सची सोय.

८. बारावासाठी वार्षिक परीक्षेपूर्वी व्याख्यानमाला व हुशार विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तावाढ प्रकल्पाची खास सोय.

९. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'कमवा व शिका योजना', विद्यार्थी दत्तक योजना', 'राष्ट्रीय सेवा योजना', 'राष्ट्रीय छात्र सेना' असे अनेक उपक्रम.

१०. समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका, बँक बँकेतून क्रमिक पुस्तके वर्षारंभीच मिळण्याची सोय.

११. सर्व सुविधांनी युक्त भव्य क्रिडांगण, क्रिडा क्षेत्रात सातत्याने उज्ज्वल यश.

१२. ६० टक्के गुणधारकांना व खेळाडूंना विशेष सवलती.

१३. कर्मवीरांच्या ध्येयधोरणानुसार चालविले जात असलेले विद्यार्थी वसतिगृह.

१४. सर्व शिष्यवृत्यांची सोय तसेच बारावीपर्यंत विद्यार्थीना मोफत शिक्षण.

१५. बालवाडी शिक्षिका अभ्यासक्रमाची सोय.

१६. ग्रामीण पत्रकारीता, संवाद व जनसंपर्क माध्यमे ह्या अभ्यासक्रमाची सोय.

१७. भरतीपूर्व सैनिक प्रशिक्षण वर्ग.

१८. इलेक्ट्रॉनिक्स द्विलक्षी अभ्यासक्रमाची अकरावी व बारावी विज्ञानसाठी नव्याने सोय.

१९. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची बी.ए., बी.कॉम. च्या पदवी अभ्यासक्रमाची नव्याने सोय.

२०. संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सोय.

२१. रोव्हार्स व रेंजर्स युनिटची सोय.

२२. यु.जी.सी. पुरस्कृत विविध ॲड ऑन कोर्सेसची सोय.

२३. आकरावी, बारावी विज्ञान वर्गांमधील गरीब परंतु हुशार विद्यार्थ्यांसाठी नव्याने गुरूकुल योजनेची सोय.

२४. नापासांची शाळा अर्थात जीवन विकास विद्यालयाची सोय.[७]

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे सुरवातीला फक्त कला शाखेचे शिक्षण देणारे महाविद्यालय होते. महाविद्यालय १९६७ मध्ये रयत शिक्षण संस्थेकडे आले. सद्या महाविद्यालयाने अनेक अडचणींवर मात करीत प्रगती केली आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान महत्वाचे आहे. त्यांच्या नावाची यादी खालील प्रमाणे देता येईल.

**महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग -**

१९६९ सालचा प्राध्यापक वर्ग

प्राचार्य - बॅ. पी.जी. पाटील

१) प्रा. वा.पु. गिंडे, २) प्रा. च.शं. पाटगावकर, ३) प्रा. अ. दि. माडगुळकर, ४) प्रा. श.भा. पाटील, ५) प्रा. जा. ज्ञि. पाटील, ६) प्रा. र.ब्यं. कणगलेकर, ७) प्रा. शा.ना. येडेकर, ८) प्रा. कु. शोभना भोडपे, ९) प्रा. का.ह. ठक्कर, १०) प्रा. स.रा. खांडेकर, ११) प्रा. ग. पा. चव्हाण, १२) प्रा. पां. अ. भोसले, १३) प्रा. कु. शोभा बागी, १४) प्रा. प्र. ना. गावडे, १५) प्रा. पी.भा. पाटील, १६) प्रा. शि. आ. चव्हाण.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील विषयानुसार प्राध्यापक यादी खालीलप्रमाणे सांगता येईल.

**मराठी -**

प्रा. ल. रा. नासिराबादकर, प्रा. सुर्यकांत रा. खांडेकर, प्रा. ल.रा. नासिराबादकर, प्रा. बी. आर. बोळाज, प्रा. र.बा. मंचरकर, प्रा. बी.एन. शिंदे, प्रा. एस.एस. हेरवाड, प्रा. एस. बी. देसाई, एम. पी. थोरात, कुमारी के.व्ही. देशपांडे, कु. एस. ए. पत्रावळे, सौ. एन. आर. मंडपे, सौ. एस. एल. देसाई, प्रा. आर. डी. पाटील, प्रा. एम. बी. जगताप, प्रा. पाटील एस. व्ही, प्रा. बी.एम. चव्हाण, प्रा. मा. के. यादव, प्रा. डॉ. व्ही. आर. घार्गे, प्रा. सौ. एस. एस. निंबाळकर, प्रा. डॉ. व्ही. पी. गिंडे, डॉ. ए.व्ही. कांबळे, प्रा. अनिल उबाळे, प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर, प्रा. सौ. एस. के. पाटील, प्रा. बी.एम. वाघ.

**इंग्रजी -**

प्रा. र.व्यं. कणंगलेकर, प्रा. शि. आ. चव्हाण, प्रा. व. पा. पवार, प्रा. सौ. मुमताज रहिमतपुरे, प्रा= ग.गो. गुळवणी, प्रा. म.अ. शेख, प्रा. सु.मु. जगताप,

प्रा. के.डी. भोपळे, प्रा. पी. टी. जोसेफे, सौ. एम. एस. पोवार, प्रा. टी.एस. सावंत, सौ. एस. ए. शिखरे, प्रा. व्ही. आर. वेदपाठक, प्रा. बी. एन.माने, प्रा. ए.पी. साळुंखे, प्रा. कु. भागडे, आर. के. प्रा. जी. बी. भोरे, प्रा. राजेंद्र लोखंडे, प्रा. सी.ए. लंगरे, प्रा. व्ही. एम. भोळे, प्रा. कु. वैशाली शिंदे, प्रा. ए.जे. चौगुले, प्रा. रघुनाथ कडाकणे, प्रा. अमर पाटील, प्रा. चंद्रकांत लंगरे, चंद्रकांत देसाई, प्रा. कु. एस.एस. गुजर.

**हिंदी -**

प्रा. च.श. पाटगावकर, प्रा. ग.पा. चव्हाण, प्रा. हिं.ज्ञा. साळुंखे, प्रा. एस.टी. घुटुकडे, प्रा. डॉ. व्ही.के.मोरे, प्रा. एस. बी. कोरे, प्रा. सौ. एम. व्ही. मोरे, प्रा. सौ. आर. जे. पाडळकर, प्रा. श्री.जे. एल. जामदार, प्रा. डॉ. व्ही.के.घाटे, प्रा. एस. आर. काशिद, प्रा. सौ.ए.व्ही. पाटील, प्रा. व्ही.व्ही. खड्ड, प्रा. एन.जी. शिंदे, प्रा.कु. एस. एन. कांबळे, प्रा. एम. ए. उपाध्ये, प्रा. मारूफ मुजावर, प्रा. डी.के. मुडे,

**इतिहास -**

प्रा. आ. द. मुदगल, प्रा. रा.ह. भोसले, प्रा. ना.धो. पाटील, प्रा. व्ही. एन. हणमाने, प्रा. टी.एच.निकम, प्रा. आर.के. गायकवाड, प्रा. आण्णासाहेब गरूड, प्रा. व्ही. के. पवार, प्रा. आर. बी. गुरव, प्रा.सी. एस. पाटील, प्रा. आ.डी. चव्हाण, प्रा. सौ. एस. एम. घाटे, प्रा. ए.एच. गुंजाळ, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. टी.डी. गिरी, प्रा. व्ही.डी. नलवडे, प्रा. डी. आर. पाटील.

**भूगोल -**

प्रा. ख. अ. खतीब, प्रा. मो.गो. जाधव, प्रा. एल.व्ही. निकम, प्रा. दि. म. पाटील, प्रा. कृ. रा. पाटील, प्रा. जी.बी. मबारे, प्रा. व्ही. आर. सुर्यवंशी, प्रा. एस. पी. दाते, प्रा. सौ. एस.एस. दाते, प्रा. के.टी. घोडके, प्रा. एम. आर. चाऊस, प्रा. यु.के.

संकपाळ, प्रा. एस. बी. महाडीक, प्रा. एस. के. घाटे, प्रा. एस. बी. चिम्मड, प्रा. एस.एन. दगडे, प्रा. डी. इ. खाडे, प्रा. यु.के. संकपाळ, प्रा. धनंजय नलवडे, प्रा. संजय सिताप, प्रा. सौ. एल. एस. पाटील.

**अर्थशास्त्र -**

प्रा. जा. झि. पाटील, प्रा. मा. ह. सुर्यवंशी, प्रा. कृ. मा. भोसले, प्रा. एस. सी. गायकवाड, प्रा. व्ही.टी. जाधव ,प्रा. एच.एन. गुरव, प्रा. एल.बी. घोलप, प्रा. एम.एस. मोहिते, प्रा. व्ही.व्ही. महामनी, प्रा. एस. बी. महाजन, प्रा. ए.एस. जाधव ,प्रा. व्ही. जे. वाढते, प्रा. बी.एस. पुणतांबेकर, प्रा. बाबासाहेब पवार, प्रा. एस. के. हिंदुले, प्रा. सौ. एम. बी. देसाई, प्रा. एम. आर. शर्मा.

**राज्यशास्त्र -**

प्रा. वि. भा. पाटील, प्रा. ल.द. शिंदे, प्रा. ए.एल. देशमुख, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. डॉ. एस.व्ही.पोवार, प्रा. कु. सुवर्णा गुडगे, प्रा. बी.आर. संकपाळ, प्रा. के.एस. मोहिते, प्रा. टी.डी.गिरी, प्रा. व्ही.एम.पाटील, प्रा. अजित गाढवे, प्रा. जे.एल. राजोपाध्ये.

**तत्त्वज्ञान व मानसशास्त्र -**

प्रा. ज.रा. दाभोळे, प्रा. एम.जी. वाली, प्रा. आर.एस. हिरवे, प्रा. एस.डी. वटमुरी, प्रा. एच.एस. पवार, प्रा. दिलीप बेडक्याळे, प्रा. अशोक चव्हाण, प्रा. ए.डी. जगताप, प्रा बाबुराव निकम, प्रा. गणेश लोखंडे, प्रा. के.एम. हिरे.

**शारिरीक शिक्षण विभाग -**

प्रा. वाय.बी.शिंदे, प्रा. रा.भा.पाटील, प्रा. आर.बी.पाटील, प्रा. ए.बी.यादव, प्रा. एस.टी.पाटील, प्रा. व्ही.एम. जाधव, प्रा. एस. बी. पाटील, प्रा. डी.डी.लोखंडे, प्रा. एस. बी. सावंत, प्रा. आर.डी. पुजारी.

**संख्याशास्त्र -**

प्रा. बी.बी. पाटील, प्रा. एस.ए.शहा, प्रा. पी.एस. चौगुले, प्रा. कु. एस.एन. मोमीन, प्रा. एस. एस. राशिवडेकर, प्रा. एस. एन. चव्हाण, प्रा. श्रीमती ए.बी. चौगुले.

**वाणिज्य विभाग -**

प्रा. प्र. न.गावडे, प्रा. अ.स. पंडित, प्रा. प.गो.दिवाण, प्रा. ना.पा. सानप, प्रा. ए.बी. साळुंखे, प्रा. व्ही.डी. दळवी, प्रा. अ.कृ. उमराणी, प्रा. डी.अे. कदम, प्रा. यु.एन.शिदे, प्रा. जी.बी. कोर्लहळ्ळी, प्रा. जी.टी. सांगले, प्रा. एस.जे. भिरूड, प्रा. व्ही.पी.पाटील, प्रा.ए.डी. भोसले, प्रा. व्ही.के.फुके, प्रा. एम. जी. बडदेर, प्रा. एस.बी. चोपडे, प्रा. एम.एल. बदसोंडे, प्रा. टी.के. कोळबे, प्रा. ए.पी. धावते, प्रा. ए.डी.भोसले, प्रा. आर.डी. साळुंखे, प्रा. जे.एल. बनसोंडे.

**सायन्स विभाग -**

प्रा. श्रीमती निंबाळकर जे.जे., प्रा. ए.ए.शिंदे, प्रा. एस.पी.होरे, प्रा. कु. जे.एन. भगरे, प्रा. एस.डी. गायकवाड, प्रा. एच.बी.पिसाळ, प्रा. सौ. आर.पी. पत्रावळी, प्रा. व्ही.के. पाटील, प्रा. पी .एल. पवार, प्रा. एस. आर. पाटील, प्रा. व्ही.एस.पाटील, प्रा. एस.ए.सावंत, प्रा. आर.जी. शेळके, प्रा. एस. बी. जाधव, प्रा. पी.वाय. भोसले, प्रा. एस.पी. यादव, प्रा. डी.बी. पुजारी, प्रा. एम. डी. पाटील, प्रा. डॉ. बी.एस. माळी, प्रा. ए.टी. पाटील, प्रा. डी.एन. कोकीळ, प्रा. एस.आर. कापरे, प्रा. बी.व्ही. जाधव, प्रा. एस.ए. वाय. पाटील, प्रा. जे.डी. क्षीरसागर, प्रा. एम.डी. पाटील, प्रा. एस.डी. ननवरे, प्रा. ए.एस. पाटील, प्रा. डी.डी. गवळी, प्रा. एस.सी. वाघमारे, प्रा. डी. के.दळवी, प्रा. एस.आर. डांगरे, प्रा. डी.ए. घाटगे, प्रा. ए.एम. पाटील, प्रा. एस.एस. सावंत, प्रा. एस.एन कणेरे, प्रा. एस.एस. राशिवडेकर, प्रा. के.के. शिंगे, प्रा. डी.एम.

पोरे, प्रा. एस. वाय.जाधव, प्रा. एम.पी. उकीरडे, प्रा. एस.व्ही. चिकुर्डेकर, प्रा. एस.एच.पिसाळ, प्रा. एस.एच. कवादे, प्रा. एस.डी. गायकवाड, प्रा. ए.ए. शिंदे, प्रा. जी.डी. कोकाटे, प्रा. आर.आर. कोल्हापूरकर, प्रा. ए.एच. रूपनर, प्रा.ए.व्ही. नागवे, प्रा. के.आर. खरात, प्रा. व्ही.ही. चंदनशिवे, प्रा. आर. जी. शेळके.

**व्यवसाय अभ्यासक्रम -**

प्रा. पाटील आर.एस., प्रा.पाटील डी.एम., प्रा. कुंभार एम.ए., प्रा. आय.एस. पीरजादे, प्रा. बी.एम. मुसळे, प्रा. रामदास पाटील, प्रा. सुनिल शिंदे, प्रा. एस.जी.पाटील, प्रा. ए.पी. पाटील, प्रा. एस.के. पाटील, प्रा. कु. निकम पी.डी., प्रा. एन.बी. पुजारी, प्रा. बी.टी. पाटील, प्रा. के.आर. पाटील, प्रा. एम.व्ही. पाटील, प्रा. एस. पी. सरनाईक, प्रा. के.एम.यादव, प्रा. जे.व्ही. सुतार, प्रा. कु.बी.जे. यादव, प्रा. आर.वाय. पाटील, प्रा. जी.डी. माळी, प्रा. पी.बी. थोरात.

**ज्युनिअर कॉलेज -**

प्रा. यू.एन. शिंदे, प्रा. सौ. एच.आर. गायकवाड, प्रा. एस.एल. मोहिते, प्रा. पी.डी. देशमुख, प्रा. आर.ए. शेख, प्रा. एस.एन. दगडे, प्रा. सौ. ए.ए.भोसले, प्रा. जे.के. थोरात, प्रा. एम.एस. जमादार, प्रा. आर. बी. पाटील, प्रा. एम.जी. वाली, प्रा. ए.एस. जाधव, प्रा.व्ही. डी. फुके, प्रा. बी.जे. पवार , प्रा. व्ही. के. पवार, प्रा. पी. एच. साळोखे, एस. बी. महाजन, प्रा. एम.व्ही. मोरे, प्रा. ए.डी. भोसले, प्रा. सौ. एस.ए. शिखरे, प्रा. एम. बी. जगताप, प्रा. एम.डी. आवारी, प्रा. श्रीमती जे. जे. निंबाळकर, प्रा. के.टी. घोडके, प्रा. व्ही. आर. वेदपाठक, प्रा. ए.ए. शिबे, प्रा.एच.बी. पिसाळ, प्रा. एस. पी. होरे.

**ग्रंथालय -**

श्री. भा.ज्ञा. पाटील, ल.ब. माने, मा.वि.शिंदे, एस.आय. महाबरी, बी.डी. पाटील, एस. पी. सावंत.

**प्रशासकीया सेवक -**

| | | |
|---|---|---|
| श्री. कृ.वि. यादव | - | हेडक्लार्क |
| श्री. भ.द.सुतार | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. अ.गा. पाटील | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. मा. वि. शिंदे | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. र.ब. सोनवणे | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री.शं.मा. भिलार | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. श.इ. महाबरी | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. वि.श्री. निकम | - | अकौंटंट |
| श्री. अ.मा. फासे | - | ऑफिस सुपरिंटेंडेंट |
| श्री. एस.आर. काकडे | - | सुपरिंटेंडेट |
| श्री. एम.बी. सोळांकुरे | - | ज्युनिअर क्लार्क |
| श्री. बी.बी. देवडकर | - | सिनिअर क्लार्क |
| श्री. पी.डी. सौदीकर | - | अधिक्षक |
| श्री. ए.जी. पाटील | - | सिनियर क्लार्क |
| श्री. सी.एम. पाटील | - | क्लार्क |
| श्री. जी.बी. पाटील | - | क्लार्क |
| कुमारी एम.एस. गंभीर | - | क्लार्क |
| श्री. बी.आर. काळे | - | क्लार्क |
| श्री. एस.व्ही. पाटील | - | प्रयोगशाळा सहाय्यक |

| | | |
|---|---|---|
| श्री. आर.के.यादव | - | क्लार्क |
| श्री. आर.टी.गरूड | - | लायब्ररी क्लार्क |
| श्री. एस.बी. भोंडवे | - | लायब्ररी क्लार्क |
| श्री. बी.ए. जाधव | - | अधिक्षक |
| श्री. ए.जी. तोडकर | - | हेडक्लार्क |
| श्री. डी.पी. चव्हाण | - | सिनियर क्लार्क |
| श्री. एन.जी. शेख | - | ज्युनियर क्लार्क |
| श्री. एस. आर. कदम | - | ज्युनियर क्लार्क |
| श्री. के.पी. फल्ले | - | लॅब अटेंडंट |
| श्री. एम.एल. कुबेर | - | ज्युनियर क्लार्क |
| श्री. जे.पी. देशमुख | - | लायब्ररी क्लार्क |
| श्री. व्ही. के. सिताप | - | लॅब अटेंडंट |
| श्री. संदेश पाडळकर | - | लॅब अटेंडंट |
| श्री. भगवान जाधव | - | लॅब अटेंडंट |
| श्री. परूषोत्तम पाटील | - | लॅब अटेंडंट |
| श्री. एस. के. डोंगरे | - | लॅब अटेंडंट |
| श्री. एच.के. डोंगरे | - | लॅब अटेंडंट |
| श्री. एच.डी लोखंडे | - | लॅब अटेंडंट |
| श्री.जे.बी. डोंगळे | - | लॅब अटेंडंट |
| श्री. एस.वाय. जाधव | - | लॅब अटेंडंट |
| सौ. ए.बी. धस-पाखरे | - | ज्युनियर क्लार्क |

**शिपाई -**

के.अे.मोमीन, एस. आर. चौगुले, के.एस. सिताफ, एस. पी. दिक्षित, आर. बी. सोनवणे, डी. टी. पेटकर, श्री. एस. बी. भोसले, व्ही. पी. दुर्गुळे, ए.एम. सणस,

एस.पी. पाटील, व्ही. के. सिताफ, आर.बी. कदम, आय.के. मोमीन, बी.एस. जाधव, बी.एस. कांबळे, एस.एस. चांदणे, डी.डी. पाटील, एम.ए. पाटोळे, मुबारक मोमीन, ज्ञानदेव पाटील, बी.टी. गोसावी.[८]

**महाविद्यालयाचा अभ्यासक्रम विस्तार -**

महाविद्यालयातील अभ्यासक्रम विस्तार टप्प्याटप्प्याने होत गेला त्याविषयी माहिती पुढीलप्रमाणे देता येईल. कला आणि वाणिज्य अशा उभय शाखांचे पदवीपर्यंत शिक्षण या महाविद्यालयामध्ये दिले जात होते. १९६४ साली महाविद्यालयातून पहिले पदवीधर बाहेर पडले. तेव्हा मराठी, हिंदी व अर्थशास्त्र हे विषय प्रधान पातळीवर शिकविण्यात येते होते. त्यानंतर क्रमशः समाजशास्त्र (१९६७), भूगोल (१९६७), इंग्लिश (१९६८), इतिहास (१९७०) ह्या विषयांचे स्वतंत्र विभाग (डिपार्टमेंट) सुरू झाले. वाणिज्य विभागाला १९६८ मध्ये आरंभ झाला आणि १९७२ मध्ये वाणिज्य विभागाची पहिली तुकडी पदवीधर बाहेर पडली. तृतीय वर्ष वाणिज्य वर्गासाठी प्रगत लेखापत्र आणि लेखाविज्ञान या विषयांच्याही अध्यापनाची सोय करण्यात आली. विद्यार्थ्यांना निवड करायला वाव मिळावा इतक्या विविध विषयांची विशेष अध्यापनाची सोय महाविद्यालयामध्ये आहे.[९]

महाराष्ट्र सरकारच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या नव्या आकृतीबंधाला अनुसरून महाविद्यालयामध्ये १९७६-७७ पासून हायर सेकंडरीचे म्हणजेच (११ वी ते १२ वी आर्टस-कॉमर्स) म्हणजेच कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गही या कॉलेजमध्ये सुरू करण्यात आले.[१०] १९८५ साली ११ वी सायन्सचा वर्ग सुरू होऊन महाविद्यालयामध्ये शास्त्र विभागाची सुरवात झाली.[११]

महाविद्यालयातील शाखा व प्रमुख विभाग यादी आर्टस शाखा -

| | | | |
|---|---|---|---|
| १) | इंग्रजी - जून १९६८ | २) | हिंदी - जून १९६१ |
| ३) | भूगोल - जून १९६८ | ४) | इतिहास - जून १९७० |
| ५) | मराठी - जून १९६७ | ६) | अर्थशास्त्र - जून १९६१ |
| ७) | समाजशास्त्र - जून १९७६ | ८) | शारिरीक शिक्षण - जून १९८५ |

**कॉमर्स शाखा -**

१) ॲडव्हान्स अकौन्टन्सी - जून १९७१

२) ॲडव्हान्स बँकिंग - जून १९८२

**सायन्स विभाग -**

१) केमिस्ट्री - १९९२

**इतर विभाग -**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एन.एस.एस. | २) | एन.सी.सी. |
| ३) | जिमखाना | ४) | स्पर्धा परिक्षा |
| ५) | कमवा आणि शिका योजना | | |

**इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय -**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालयाची स्थापना २५ सप्टेंबर १९८५ रोजी भारताची राजधानी दिल्ली येथे झाली. १ जानेवारी १९८७ पासून देशात निरनिराळ्या ठिकाणी स्थापन झालेल्या अभ्यास केंद्रामार्फत विविध शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यास सुरवात झाली. सद्या या विद्यापीठाचा कारभार १३३ अभ्यास केंद्रामार्फत चालतो. माननीय सुभाषचंद्र भोसले यांच्या प्रेरणेने व प्रयत्नामुळे १९ एप्रिल १९८८ रोजी या महाविद्यलायात अभ्यास केंद्राची स्थापना झाली. सद्या या अभ्यास केंद्रामार्फत बी.ए., बी.कॉम. व डिप्लोमा इन मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम शिकविले जातात. प्रत्येक आठवड्यात

शनिवारी व रविवारी विद्यार्थ्यांना तज्ञ प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जाते. मार्गदर्शनासाठी व्हिडीओ व ऑडीओ कॅसेटस व मुक्त विश्वविलयाकडून पुरविल्या गेलेल्या क्रमिक पुस्तकांचा वापर केला जातो. तसेच या अभ्यास केंद्रात सुमारे ३० संदर्भ ग्रंथ सुमारे ८० व्हिडीओ व ऑडिओ कॅसेटस आहेत.[१२]

**व्यवसाय अभ्यासक्रम विभाग -**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेतील 'कमवा व शिका' या योजनेचा आदर्श समोर ठेवून श्रमाला प्रतिष्ठा देणारा महाविद्यालयातील एक आदर्श विभाग म्हणजे व्यवसाय अभ्यासक्रम विभाग होय.

महाविद्यालय परिसरातील समाजाची शैक्षणिक गरज ओळखून दूरदृष्टीने संस्थेने १९९२-९३ पासून टेक्निकल गटाअंतर्गत बिल्डींग मेन्टेनन्स, मेन्टेनन्स अँड रिपेअर्स ऑफ इलेक्ट्रीकल डोमॅस्टिकल अप्लायन्सेस हे दोन व वाणिज्य गटांतर्गत अकौंटींग व ऑडीटिंग असे तीन अभ्यासक्रम सुरू आहेत.[१३]

**बी.एस्सी.भाग - १ -**

महाविद्यालयामध्ये बी.एस्सी.भाग १ या अभ्यासक्रमाची सुरूवात १९९४ साली झाली. यावेळी प्राचार्य म्हणून मा. के. यादव हे होते.[१४] जून १९९६ पासून बी.एस्सी.-३ या वर्गाला सुरूवात झाली.[१५]

**नापासांची शाळा -**

महाविद्यालयातील अध्यापकांच्या ज्ञानाचा फायदा परिसरातील शालाबाह्य विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून २००४-०५ या शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या वतीने १० वी नापास झालेल्या व ८ वी, ९ वी मध्ये शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनौपचारिक पद्धतीची एक शाळा सुरू करण्यात आली.

या शाळेस प्रचलित नाव 'नापासांची शाळा' असे असले तरी महाविद्यालयाने त्यास 'जीवनविकास विद्यालय' असे नाव दिले आहे.[१६]

**बालवाडी शिक्षिका शिक्षण अभ्यासक्रम -**

महाविद्यालयात सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तारकार्य विभागासाठी बालवाडी शिक्षिका शिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.[१७]

**भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र -**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीमार्फत महाविद्यालयात २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. महाविद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ मिळावा यासाठी हे केंद्र चालू करण्यात आले आहे.

१. पोलीस
२. रेल्वे पोलीस
३. एस.आर.पी. पोलीस
४. सी.आर.पी.एफ.
५. नर्सिंग असिस्टंट
६. सैन्य भरती[१८]

या क्षेत्रातील योग्य उमेदवारांच्या भरतीसंबंधीचे प्रशिक्षण दिले जाते.

**संगणक शिक्षण -**

संगणक साक्षरता ही काळाची गरज आहे हे लक्षात घेऊन महाविद्यालयामध्ये संगणक शिक्षण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. २५ एप्रिल, २००५ पासून एम.एस.सी.आय.टी. हा कोर्स महाविद्यालयात सुरू करण्यात आला.[१९]

**ग्रामीण पत्रकारिता व जनसंपर्क माध्यमे अभ्यासक्रम -**

प्रत्येक विद्याथ्यामध्ये कोणता तरी सुप्त गुण असतोच. काहींना वाचनाची, काहींना लेखनाची आवड असते. लेखनकलेला वाव देण्यासाठी २००५ पासून महाविद्यालयात 'ग्रामीण पत्रकारिता व जनसंपर्क माध्यमे' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. हा वर्ग सुरू करण्यासाठी प्रा. टी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. ह्या अभ्यासक्रमाचे वर्ग १ सप्टेंबर, २००५ पासून सुरू झाले.[२०]

राजर्षी शाहू व कर्मवीर आण्णा ह्या दोन थोर महापुरूषांच्या आचारविचारांपासून प्रेरणा घेवून राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय वाटचाल करीत आहे. सुरूवातीला फक्त आर्टस ही एकच शाखा महाविद्यालयामध्ये सुरू होती. परंतु बदलत्या काळानुसार गरजेप्रमाणे महाविद्यालयामध्ये वरील विविध शाखा व अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न प्राध्यापक करीत आहेत. म्हणूनच तर अनेक गुणवंत विद्यार्थी या महाविद्यालयात तयार झाले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे सांगता येईल -

**महाविद्यालयीन गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी यादी -**

१. जयसिंग शामराव कांबळे - ११ वी आर्टस
सखुबाई मेधाजी कांबळे पारितोषिक
२. कु. प्रतिभा बापुराव जोशी - सोशल सायन्स स्कॉलरशिप
३. कु.गाट कल्पना आप्पासाहेब - सोशल सायन्स स्कॉलरशिप
४. कु.गाट लता आप्पासाहेब - सोशल सायन्स स्कॉलरशिप
५. श्री. मुल्ला मन्सूर अमीन - शिवाजी विद्यापीठ हिंदी शिष्यवृत्ती
६. श्री. तळसंदेकर रविंद्र शामराव - शिवाजी विद्यापीठ हिंदी शिष्यवृत्ती
७. श्री. पाटील हिंदुराव निवृत्ती - शिवाजी विद्यापीठ हिंदी शिष्यवृत्ती

८. श्री. पाटील आकाराम लखू - शिवाजी विद्यापीठ हिंदी शिष्यवृत्ती

९. श्री. खोत वसंत महादेव - शिवाजी विद्यापीठ हिंदी शिष्यवृत्ती

१०. कु.पाटील कल्पना पांडुरंग - हिंदी शिष्यवृत्ती[२१]

११. कुमार बुधले - भारत सरकार हिंदी शिष्यवृत्ती

१२. कु.सुचित्रा गाठ - बी.कॉम. ३ - बँकिंग विषय युनिव्हर्सिटीत मेरीटमध्ये

१३. श्री. रमेश खाडे - बी.ए. - इतिहास विषयामध्ये युनिव्हर्सिटीत प्रथम

१४. कु.ललीता चव्हाण - इतिहास विषयामध्ये युनिव्हर्सिटीत मेरीटमध्ये

१५. कु.निता फर्नांडिस - भूगोल - विद्यापीठामध्ये गुणानुक्रमे सहावी[२२]

१६. श्री.सरदार बाबासाहेब जाधव- मार्च १९९८ बारावी परीक्षेत कला विद्याशाखेमध्ये कोल्हापूर विभागात अकरावा व अनुसूचित जातीमध्ये सर्वप्रथम[२३]

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासात तर हुशार आहेतच त्याचबरोबर इतर विविध कलेच्या क्षेत्रातही त्यांनी महाविद्यालयाचे नाव चमकवले आहे. यामध्ये मिनाक्षी शर्मा या विद्यार्थिनीने क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे ह्यांच्यामार्फत जिल्हास्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वतीने 'महाराष्ट्र संगीतरत्न' या दूरदर्शनच्या मराठी भावगीतांच्या कार्यक्रमासाठी - प्रथम फेरीसाठी कु. मिनाक्षी शर्मा हिची निवड करण्यात आली.[२४] शैलेश कांबळे व विकास सावंत या दोन विद्यार्थ्यांची चित्रकला राज्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.[२५] कोल्हापूरमधील सुरभी संस्थेने राज्य पातळीवर आयोजित केलेल्या शास्त्रीय गायन स्पर्धेत महाविद्यालयीन प्रसेनजीत कोसंबी व अभिजित कोसंबी (बी.ए. भाग-२) यांनी भाग घेवून द्वितीय

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

क्रमांक मिळविला. तसेच झी सारेगम या गायन कार्यक्रमासाठी त्यांची निवड झाली. तसेच समीर सोनेखान (बी.ए.भाग-१) याची दूरदर्शन मालिकेसाठी निवड करण्यात आली.[२६]

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न हे महाविद्यालय करते. येथील प्राध्यापकवर्ग विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करीत असतो. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी लक्षात घेवून त्यांची गुणवत्ता कशा प्रकारे वाढेल यादृष्टीने महाविद्यालय सतत प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

**महाविद्यालयाने गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न -**

**१. अभ्यासक्रम नियोजन व हजेरी -**

महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे व प्रभावीपणे व्हावे यासाठी अध्यापनाचे वेळापत्रक तयार करून अध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी नोटीस बोर्डवर लावण्यात येते. शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला शैक्षणिक वेळापत्रक तयार करून ते विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येण्यासाठी माहितीपत्रकात प्रसिद्ध केले जाते. त्यादृष्टीने अध्यापक वर्गास संपूर्ण वर्षाचे अध्यापनाचे नियोजन करण्यास सांगितले जाते. प्रथम सत्राच्या अखेरीस नियोजनाप्रमाणे अध्यापनाचे काम झाले किंवा नाही याबद्दल अध्यापकांकडून अहवाल मागविले जातात.

**२. महाविद्यालयीन परीक्षा -**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षेच्या दृष्टीकोनातून तयारी व्हावी व लेखनाचा सराव व्हावा या हेतूने महाविद्यालयांतर्गत मूल्यमापन परीक्षा घेतल्या जातात. सत्र परीक्षा, घटक चाचण्या, पूर्व परीक्षा घेतल्या जातात. या सर्व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीचे संबंधित विषय शिक्षकांकडून वेळेवर मूल्यमापन

केले जाते. त्याची माहिती विद्यार्थ्यांना देवून उत्तरे सुधारण्यासाठी योग्य त्या सूचना व मार्गदर्शन केले जाते. अभ्यास प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग अधिक व्यापक व सक्रिय व्हावा यासाठी चर्चासत्र, मार्गदर्शनपर व्याख्याने, आयत्यावेळी चाचण्या असे उपक्रम राबविले जातात.[२७]

**३. गुणवत्ता सुधार प्रकल्प -**

या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी हे सर्वसाणारणपणे गरीब कुटुंबामधील व अभ्यासाच्या दृष्टीने कमकुवत व मागासलेले असतात. त्यांची घरची परिस्थिती शिकवणी लावण्याएवढी सक्षम नसते, बरेच विद्यार्थी स्वयंरोजगार करून स्वावलंबी शिक्षण घेतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही म्हणून विद्यार्थी महाविद्यालयामध्ये असतानाच त्याला अभ्यासासाठी प्रवृत्त केले जाते.

२००१-२००२ पासून प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयामध्ये गुणवत्ता वाढ प्रकल्प राबविण्यास सुरूवात झाली आहे. ह्या प्रकल्पामध्ये खालील बाबींवर लक्ष दिले जाते.

**अ. विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी -**

जे विद्यार्थी सातत्याने गैरहजर आहेत अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना पत्र पाठवून त्यांना महाविद्यालयात बोलावून घेण्यात आले व मा. प्राचार्यांसमवेत पाल्याच्या वर्तणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. परिणामतः विद्यार्थ्यांची हजेरी वाढली.

**ब. अचानक परीक्षा -**

आधीच्या आठवड्यात झालेल्या अभ्यासक्रमावर २० गुणांची परीक्षा घेण्यात येते. त्यामुळे विद्यार्थी नियमित अभ्यास करतात.

**क. बारावी बोर्डाच्या प्रश्नपत्रिका -**

प्रत्येक विद्यार्थ्याकडून बोर्डाच्या प्रत्येकी पाच प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्ड पॅटर्न समजतो व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बोर्डाच्या परीक्षेविषयी भिती राहत नाही.

**ङ उन्हाळी वर्गाचे आयोजन -**

अकरावीची सत्र दोन परीक्षा झाल्यानंतर १ एप्रिल ते ३० एप्रिल ह्या कालावधीत बारावीचे जादा तास घेतले जातात.

**इ. सराव परीक्षा -**

संस्थेच्या ध्येयधोरणानुसार दोन सराव परीक्षा प्रात्यक्षिकासह महाविद्यालयात घेतल्या जातात. या परीक्षांचे मूल्यमापन लगेच केल्यानंतर त्याची गुणपत्रिका विद्यार्थ्यांना दाखवून झालेल्या चुका कशा सुधारावयाच्या याविष्यायी शिक्षक मार्गदर्शन करतात.

या प्रकल्पामुळे महाविद्यालयातील १२ वीचा निकाल वाढण्यास मदत झाली.

**४. विद्यार्थी दत्तक पालक योजना -**

'विद्यार्थी दत्तक-पालक योजना' ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविली जाणारी योजना आहे. या योजनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी लक्षात घेवून त्या निवारण करणे.

२. व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व सूचना करणे.

३. स्पर्धात्मक परीक्षेसंदर्भात सर्व माहिती व साहित्य त्यांना उपलब्ध करून देणे.

४. विद्यार्थ्यांना विषय मार्गदर्शन करणे.

५. स्वयंरोजगार शोधण्यासाठी विविध उपक्रमांची माहिती देणे.

प्रत्येक वर्षी ही योजना महाविद्यालयामध्ये राबविली जाते. विद्यार्थ्यांकडून भरून घेतलेल्या अर्जावरून निष्कर्ष काढले जातात. त्यासंदर्भात प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. त्याच्या शैक्षणिक व गुणात्मक विकास करण्याच्या दृष्टीने शिस्त, संयम, वेळेचे महत्व, सहनशीलता, नीटनेटकेपणा, मुलाखती संदर्भात मार्गदर्शन करण्यात येते. काही विद्यार्थ्यांना एस.टी. पाससाठी आर्थिक मदत करण्यात येते. शिक्षणाबद्दलची अनास्था दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांची चर्चासत्रे घेण्यात येतात.[२८]

५. इंग्रजी, अकौन्टन्सी यासारख्या विद्यार्थ्यांना कठीण वाटणाऱ्या विषयांची विशेष तयारी करून घेण्यासाठी सुट्टीत जादा वर्ग घेतले जातात.

६. प्रत्येक वर्गात पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक संच दिले जातात.[२९]

७. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परीक्षेत यश प्राप्त व्हावे यादृष्टीने विविध विषयांमधील तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांची व्याख्याने आयोजित केली जातात.[३०]

८. विद्यार्थ्यांसाठी वाचन कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे.[३१]

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने क्रिडा क्षेत्रात तर नावलौकिक मिळविला आहेच. त्याचबरोबर या महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासाच्या दृष्टीनेही पुढे आहेत. यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक सर्वतोपरी सहकार्य करीत असतात. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी गुणवत्ता वाढावी म्हणून वेगवेगळ्या योजना आखल्या जातात व विद्यार्थीही या योजनांना उत्स्फुर्त प्रतिसाद देतात हे विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षा निकालावरून समजते.

**विद्यार्थिनींकडून विशेष शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त -**

महाविद्यालयातील विद्यार्थिनींनीही अभ्यास, क्रिडा व इतर विविध स्पर्धांमध्ये कौतुकास्पद यश मिळविलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु.कांचन परूळेकर | - | कै. पंगू ढाल विजेती<br>गोगटे ढाल विजेती<br>कर्मवीर ढाल विजेती[३२] |
| २. | कु. उर्मिला मोहिते | - | हिंदु शिष्यवृत्ती प्राप्त |
| ३. | कु. लता गाट | - | समाजशास्त्र शिष्यवृत्तीप्राप्त |
| ४. | कु.प्रतिभा जोशी | - | समाजशास्त्र शिष्यवृत्तीप्राप्त |
| ५. | कु.कल्पना गाट | - | समाजशास्त्र शिष्यवृत्तीप्राप्त |
| ६. | कु.शैला कुलकर्णी | - | हिंदी शिष्यवृत्तीप्राप्त[३३] |
| ७. | कु.कलावती कदम | - | हिंदीमध्ये सर्वप्रथम हिंदी शिष्यवृत्तीप्राप्त (१२ वी आर्टस)[३४] |
| ८. | कु.सुलक्षणा रमेश पाटील | - | ११ वी सायन्स ७९.७१% मिळवून प्रथम - सखुबाई मेघाजी पारितोषिक प्राप्त[३५] |
| ९. | कु.त्रिवेणी घाटगे | - | शिवाजी विद्यापीठाची १०,००० रू.ची गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त[३६] |
| १०. | कु.सारीका पाटील | - | समाजशास्त्र या विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची १०,००० रू.ची गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त.[३७] |

**दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने केलेले प्रयत्न -**

रयत शिक्षण संस्थेचे बहुजन हिताय। बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य आहे. समाजातील तळागाळापर्यंतच्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, त्यांची प्रगती व्हावी

या उद्देशाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी त्यांना सहकार्य करणे हे रयत शिक्षण संस्थेचे धोरण आहे व या धोरणाप्रमाणेच राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी प्रयत्न करीत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी केलेले प्रयत्न पुढीलप्रमणे -

१. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये 'कमवा व शिका' ही योजना राबविली जाते÷ या योजनेमुळे गरीब व गरजू विद्यार्थी काम करीत पदवीपर्यंत आपले शिक्षण पूर्ण करू शकतात.[३८]

२. महाविद्यालयामध्ये गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी बुक बँक योजनेमधून वर्षभरासाठी मोफत पुस्तके दिली जातात.[३९]

३. अकरावी आणि बारावीच्या गरीब विद्यार्थ्यांना सर्व विषयाची पुस्तके वर्षभर विनामूल्य दिली जातात.

४. परगावाहून रेल्वेने किंवा बसने येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत पासची सोय करण्यात आली.

५. महाविद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी फी माफीचा विचार केला जातो.

६. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या गुणानुक्रमे पहिल्या आलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यास श्री मेघाजीराव कावळे ही शिष्यवृत्ती दिली जाते.[४०]

७. महाविद्यालामध्ये प्रवेश घेणारे काही विद्यार्थी हे गरीब कुटुंबातील व अभ्यासाच्या दृष्टीन कमकुवत व मागासवलेले असतात. त्यांच्या घरची परिस्थिती खाजगी शिकवणी

लावण्याएवढी सक्षम्य नसते. बरेच विद्यार्थी स्वयंरोजगार करून स्वावलंबी शिक्षण घेत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही म्हणून विद्यार्थी महाविद्यालयात असतानाच त्यांना अभ्यासास प्रवृत्त करणे गरजेचे असते. यासाठी महाविद्यालयात १९९७-९८ पासून गुणवत्तावाढ प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.[४१]

८. विद्यार्थी दत्तक पालक योजना या योजनेनुसार विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजावून घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्न महाविद्यालयामधून केला जातो.[४२]

**विशेष व्याख्याने -**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी फक्त पुस्तकी ज्ञान असून चालत नाही तर बाहेर समाजामध्ये घडत असलेल्या विविध घटनांचे, विविध विषयांचे ज्ञान असणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांने बौद्धिक आकलन वाढण्यासाठी अर्थपूर्ण मागदर्शनपर व्याख्यानांची गरज असते. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्येही चालू घडामोडींवर आधारित विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाते. ही व्याख्याने अभ्यासक्रम, जगातील चालू घडामोडींवर आधारित, विविध विषयांवर असतात. यासाठी ता व्यक्तींना आमंत्रित केले जाते. व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडते. तसेच परीक्षेसाठीही ही व्याख्याने विद्यार्थ्यांना उपयोगी पडतात. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये झालेली विशेष व्याख्याने पुढीलप्रमाणे सांगता येतील -

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये १६ जुलै, १९७० रोजी कोल्हापूरच्या दैनिक सत्यवादीचे संपादक श्री बाळासाहेब पाटील यांचे व्याख्यान झाले.

| अ. क्र. | दिनांक | व्याख्यात्याचे नाव | कार्यक्रमाचे स्वरूप | विषय | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३/१०/१९७० | पी.बी. साळुंखे | गांधी जयंती | म.गांधी[४३] | |
| २. | ७/७/१९७२ | डॉ. बाबा आढाव | | एक गाव एक पाणवठा | |
| ३. | १२/८/१९७२ | रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य श्री एन.डी. पाटील | | स्वातंत्र्योत्तर काळातील समाजजीवन : प्रगती की परागती[४४] | |
| ४. | ३/११/१९७३ | श्री हमीद दलवाई | | भारताचे मुस्लिम राष्ट्रविषयक धोरण | |
| ५. | ३०/७/१९७३ | डॉ. स. ग. मालशे (मराठी विभाग प्रमुख ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | | मराठी रंगभूमी | |
| ६. | २७/८/१९७४ | प्राचार्य डॉ. ह.की. तोडमल | | लायतत्व[४५] | |
| ७. | ३/१२/१९७४ | कॉ. दत्ता देशमुख | | भारतीय कृषीसमस्या व दुष्काळ निर्मुलन[४६] | |
| ८. | डिसेंबर १९७७ | डॉ.बी. आर. कांबळे शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग प्रमुख | आंबेडकर जयंती | डॉ.बाबासाहेब आंबेडकर[४७] | |
| ९. | - | श्री बा.श्री. पागे उपप्रादेशिक सेवा योजना अधिकारी | | स्वयंरोजगार व मुलाखत तंत्र काळाची गरज[४८] | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | - | डॉ. एस.एम. कोरी संचालक, मेगाबाईट कॉम्प्युटर क्लब, कोल्हापूर. | | संगणक शिक्षण आणि व्यवस्थापन[४९] |
| ११. | - | कॉ. गोविंद पानसरे | | साम्यवादी राष्ट्रातील परिवर्तन प्रक्रिया[५०] |
| १२. | ११/२/१९९१ | ॲड्सौ. मंगला बडदरे | | एकतर्फी प्रेमाची घटना : बोध[५१] |
| १३. | २६/७/१९९५ | प्रा.जे.आर. दाभोळे | राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती | राजर्षी छत्रपती शाहू महाराज |
| १४. | २३/१/१९९६ ते ३१/१/१९९६ | प्रा. बिचकर | व्याख्यानमाला | पदार्थविज्ञान |
| | | प्रा. शिवडेकर | | जीवशास्त्र |
| | | प्रा. कन्हेरे | | गणित |
| | | प्रा. मोरे | | इंग्रजी |
| | | प्रा. एस.बी. पाटील | | इंग्रजी |
| | | प्रा. धर्मे | | अकौन्टन्सी |
| | | प्रा. भंडारी | | अकौन्टन्सी[५२] |
| १५. | २/८/१९९२ | नरेंद्र दाभोळकर | चर्चासत्र | अंधश्रद्धा निर्मूलन[५३] |
| १६. | ४/१२/१९९८ | प्रा.डॉ. ज.रा.दाभोळे | | अमेरिकेतील जनजीवन व समस्या[५४] |
| १७ | | प्रा.आर.व्ही.पंडित (पुणे) | एच.एस.सी. व्याख्यानमाला | इंग्रजी |
| | | प्रा. आर.जी. सुर्यवंशी (सातारा) | | इंग्रजी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रा.सी.बी.धर्मे<br>प्रा.डॉ.बी.पी.जाधव | | अकौन्टन्सी<br>गणित[५५] |
| १८ | ५/२/२००३ | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>मराठी विभाग प्रमुख,<br>संगमेश्वर महाविद्यालय,<br>सोलापूर. | | 'नटसम्राट'[५६]<br>नाटककार |
| १९ | २/१२/२००३ | ॲड. रावसाहेब शिंदे<br>(श्रीरामपूर-अहमदनगर<br>व्हाईस चेअरमन)<br>रयत िक्षण संस्था | | आजच्या शिक्षणा-<br>पुढील आव्हान[५७] |
| २० | ६/९/२००४ | श्रीधर हेरवाड | | अध्यापक प्रबोधिनी[५८] |
| २१ | २००४-०५ | मा. प्रविण कायंदे,<br>कोल्हापूर, विभागीय<br>प्रकल्प अधिकारी | | उद्योग विकास व<br>व्यावसायिक<br>स्वयंरोजगाराच्या<br>संधी |
| २२ | | एस.एस. शर्मा,<br>सार्वजनिक बांधकाम<br>विभाग | | - " - |
| २३ | | डॉ. अनिल माळकर | | - " -[५९] |
| २४ | .१४/१/२००३ | प्रा.डॉ. मधूकर<br>बाचूळकर | राष्ट्रीय सेवा<br>योजनेअंतर्गत | जलसाक्षरता |
| २५ | .२५/९/२००२ | लक्ष्मण माने | कर्मवीर जयंती[६०] | |

**महाविद्यालामध्ये देण्यात येणाऱ्या शैक्षणिक फी सवलती -**

पिढ्यानं पिढ्या शिक्षणापासून वंचित असणाऱ्या बहुजनांच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. वंचित व

सर्वसामान्य गरीब मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थेने विविध योजना अंमलात आणल्या. संस्थेच्या धोरणाप्रमाणे शाहू महाविद्यालयामध्येही विविध शैक्षणिक सवलती व फी सवलती दिल्या जातात. त्याचा फायदा महाविद्यालयातील गरीब, होतकरू, विद्यार्थ्यांना होतो. महाविद्यालयातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलती व फी सवलती पुढीलप्रमाणे सांगता येतील -

इ.बी.सी. फी सवलत

पी.टी.सी. फी सवलत

एस.टी.सी. फी सवलत

संस्था सेवक फी माफी

महाविद्यालयातून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्या -

१. एस.टी. शिष्यवृत्ती
२. व्ही.जे.एन.टी. (अ,ब,क,ड) शिष्यवृत्ती
३. ओबीसी शिष्यवृत्ती
४. एस.सी. शिष्यवृत्ती
५. फ्रिशीप
६. शाहू गुणवत्ता शिष्यवृत्ती
७. माजी सैनिक शिष्यवृत्ती
८. अपंग शिष्यवृत्ती[६१]

**शैक्षणिक सवलती -**

**बुक बँक योजना -**

शाहू महाविद्यालयामध्ये विविध शैक्षणिक सवलती दिल्या जातात. त्यामध्ये बुक बँक योजना ही अतिशय महत्त्वपूर्ण योजना राबविली जाते. या योजनेस १९७० सालापासून सुरूवात झाली. महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या

पुस्तकांची गरज आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना बुक-बँक योजनेतून पुस्तकांच्या किंमतीच्या १/४ किंमत घेवून वार्षिक परीक्षा होईपर्यंत पुस्तके वाचावयास दिली जातात.[६२]

त्याचप्रमाणे प्रत्येक वर्गातील पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना साठ टक्के मार्क्स मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना, उत्कृष्ट खेळाडूंना व अभ्यासू व गरजू विद्यार्थ्यांना बुक बँक योजनेतून पुस्तकांचे संपूर्ण संच देण्यात येतात. अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या योजनेचा उपयोग करून अभ्यासक्रम पूर्ण केला.[६३] या योजनेचा फायदा घेतलेल्या विद्यार्थी संख्येचा आलेख पुढीलप्रमाणे देता येईल.[६४]

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९७०-७१ | २५६ |
| १९७१-७२ | ४७६ |
| १९७२-७३ | ८०० |
| १९७३-७४ | ७२५ |
| १९७४-७५ | ९७५ |
| १९७५-७६ | ९७५ |
| १९७६-७७ | ७५० |
| १९७७-७८ | ९०७ |
| १९७८-७९ | ९३० |
| १९७९-८० | ९५० |
| १९८०-८१ | ९९८ |
| १९८१-८२ | ९९६ |
| १९८२-८३ | १०८० |
| १९८३-८४ | १०८० |
| १९८४-८५ | – |

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९८५-८६ | ८८९ |
| १९८६-८७ | १००० |
| १९८७-८८ | ८३६ |
| १९८८-८९ | – |
| १९८९-९० | १०१२ |
| १९९०-९१ | १२०० |
| १९९१-९२ | १२०० |
| १९९२-९३ | ९१६ |
| १९९३-९४ | ९५० |
| १९९४-९५ | – |
| १९९५-९६ | ९६० |
| १९९६-९७ | ६५० |
| १९९७-९८ | ६५० |
| १९९८-९९ | ७४२ |
| १९९९-२००० | ७४२ |
| २०००-०१ | ७६१ |
| २००१-०२ | ६६९ |
| २००२-०३ | – |
| २००३-०४ | ६५५ |
| २००४-०५ | ६२८ |
| २००५-०६ | ५५८ |

वरील आकडेवारीवरून संस्था आणि महाविद्यालय यांनी स्वीकारलेला दृष्टीकोन समजण्यास मदत होते. प्रथम वर्षामध्ये २५६ विद्यार्थ्यांनी बुक बँक योजनेचा लाभ

घेतला तर १९९०-९१ या शैक्षणिक वर्षामध्ये उच्चांकी १२०० विद्यार्थी सदर योजनेचे लाभार्थी ठरले. ही बाब महाविद्यालयाच्या दृष्टींने अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. कारण इतक्या मोठ्या संख्येने लाभार्थी इतर महाविद्यालयामध्ये क्वचितच आढळतील. अडचणीवर मात करीत अधिकाधिक गरजू विद्यार्थी शिकले पाहिजेत या कर्मवीर भाऊराव पाटील यांचा दृष्टीकोनच या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये प्रतिबिंबीत होतो.

**महाविद्यालयामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व समाजाभिमुख उपक्रम-**

रयतेशी प्रामाणिक निष्ठा बाळगणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आचारविचारांचा वसा पुढे चालविण्याचा प्रयत्न रयत शिक्षण संस्था आणि तिच्या शाखांमध्ये केला जाता. सामाजिक बांधिलकीचे व्रत राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयानेही जोपासले आहे. या महाविद्यालयात अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना समाजातील समस्या कशा प्रकारच्या असतात याविषयी माहिती होण्यासाठी विविध समाजाभिमुख उपक्रम राबवले जातात. यामधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण केली जाते. महाविद्यालयीन विद्यार्थी हे देशाचे, समाजाचे आधारस्तंभ असतात आणि अशा विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करण्याचे कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय करीत आले आहे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक व सामाजिक विकास व्हावा यासाठी महाविद्यालयामध्ये विविध योजना आणि उपक्रम राबविले जातात, त्याबद्दल माहिती पुढीलप्रमाणे -

१. राष्ट्रीय सेवा योजना
२. प्रौढ व निरंतर शिक्षण योजना
३. शाळासमूह योजना
४. झोपडपट्टी दत्तक योजना
५. व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा

६. प्लॅनिंग फोरम

७. कमवा आणि शिका योजना

८. विद्यार्थी दत्तक पालक योजना

९. गुणवत्ता सुधार योजना

१०. विवेकवाहिनी व्यासपीठ

११. कर्मवीर विद्या प्रबोधिनी/ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

१२. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस विभाग

वरील योजना व उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल-

१. राष्ट्रीय सेवा योजना -

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची परवानगी १९७५-७६ साली विद्यापीठाने दिली. त्यामध्ये १० विद्यार्थ्यीनी व ९० विद्यार्थी अशा एकूण १०० विद्यार्थ्यांना या योजनेमध्ये प्रवेश मिळाला.[६५] राष्ट्रीय सेवा योजनेस १९७५ साली सुरूवात झाली असली तरी सामाजिक बांधिलकीचे व्रत रयतच्या विद्यार्थ्यांनी प्रारंभापासून स्वीकारले आहे. १ एप्रिल, १९६७ पासून हे महाविद्यालय रयत शिखण संस्थेकडे आले. तत्पूर्वी ताराराणी विद्यापीठाकडे हे कॉलेज असल्यापासूनच कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनी समाजाच्या सेवेसाठी धावून गेलेले आहेत. पानशेत पूरग्रस्तांसाठी शहरातील घरोघरी हिंडून धान्य, कपडे, औषध व पैसे घेऊन बिहारमध्ये गेले व जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनानुसार बिहारमधील खेड्यापाड्यात घरोघर जाऊन मदत पोहचवली. यामध्ये किर्ती महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री. किसन कुराडे व मार्गदर्शक म्हणून प्रा. चंद्रकांत पाटगावकर हे गेले होते.

तामिळनाडूमध्ये १९६६ च्या मे महिन्यात महाराष्ट्रातील १५ कॉलेज विद्यार्थी घेऊन आंतरभारतीतर्फे गेलेल्या राष्ट्रीय एकात्मतेच्या स्नेहयात्रेचे नेतृत्वही प्रा. पाटगावकर यांनी केले होते.

कोयना भूकंपग्रस्तांसाठी प्रत्यक्ष तेथे जाऊन पाटणजवळ केळश्याी या गावी कँप ठोकून महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थी व प्रा. पाटगावकर आणि प्राध्यापक ठक्कर, प्रा. कणंगलेकर यांनी मदत वाटपाचे कार्य केले. १९६८-६९ च्या मे महिन्यात महारोगी सेवक पू.श्री. बाबा आमटे यांचे मार्गदर्शनाखाली सोमनाथ येथील जंगलात श्रमसंस्कार छावणी घेण्यात आली. तेथील जंगल तोडून व जमिनींना बांध घालून शेतीयोग्य जमीन तयार करण्यात आली. या श्रमसंस्कार शिबीरात ज्योती बिरंजे, अशोक किनिंगे, कुमार खोत, रावसो माळी व नानासो डिग्रजे हे कॉलेज विद्यार्थी प्रा. पाटगावकरांच्या नेतृत्वाखाली सहभागी झाले.

बरकी (ता. शाहूवाडी) या गावी मे १९७१ मध्ये शांतीसेनेचे श्रमशिबीर झाले. त्यामध्ये शाहू कॉलेजच्या पाच विद्यार्थ्यांना घेऊन प्रा. पाटगावकर गेले होते.

१९७३ मध्ये कुरूकली येथे पाझर तलाव खुदाईचे काम श्रमशिबीरातर्फे करण्यात आले. कोल्हापूर यूथ सेंटरचे चेअरमन या नात्याने प्रा. पाटगावकर हे या शिबीराचे प्रमुख होते व त्यात या कॉलेजच्या १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मा. कुलगुरू प्रा. भोगिशयन कॉलेजचे प्राचार्य श्री. आर. डी. गायकवाड, आमदार सदाशिवराव मंडलिक यांनी समाजकार्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

महाराष्ट्र शासनाने सुरूवातीच्या किर्ती कॉलेजला कदमवाडी रोडला कावळा नाक्यानजीक ३ एकर जागा दिली. कॉलेजला जागा मिळाली तेव्हा जागेशेजारी गलिच्छ झोपडपट्टी होती. सुरूवातीला झोपडपट्टीतील मंडळी कॉलेजच्या मैदानावर प्रार्तविधी करून सर्वत्र घाण करीत असत. त्यासाठी या झोपडपट्टीवासियांना विनंती करून समजावून सांगण्याचे जिकीरीचे काम कॉलेजच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले. इमारतीच्या भूमिपूजनाचा समारंभ महसूलमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांच्या

हस्ते २२/२/१९६९ रोजी झाला. त्याच्या आदल्या दिवसभर म्हणजे २१/२/१९६९ रोजी प्राध्यापक व विद्यार्थी यांनी मैदानावरील विष्ठा उचलून मैदानाची स्वच्छता केली. दुसऱ्या दिवशी भूमिपूजन होते. पुन्हा पहाटे विष्ठेचे ढीग पडू नयेत म्हणून रात्रभर विद्यार्थी व प्राध्यापकांनी पहारा दिला. कॉलेजची इमारत उभी राहिल्यानंतर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आसपासचा परिसर स्वच्छ केला. कॉलेजच्या कंपाऊंडभोवती झाडांसाठी खड्डे खणले. आज कंपाऊंडभोवती वृक्षराजी डौलाने उभी आहे ती या प्रारंभीच्या विद्यार्थी प्राध्यापकांच्या श्रमाचे फळ आहे.[६६]

राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट कॉलेजला मिळाल्यानंतर कॉलेजमध्ये खेडे दत्तक योजने प्रमाणे झोपडपट्टी दत्तक योजना सरू केली. अस्वच्छता व रोगराई विरूद्ध झुंज या धडक मोहीमेनुसार २०/११/१९७५ ते २९/११/१९७५ असे दहा दिवसांचे विद्यार्थी शिबीर झोपडपट्टीमध्ये घेतले. सांडपाण्यासाठी ड्रेनेजचे चर खोदले. झाडांसाठी ३' x ३' x ३' चे ३० खड्डे खोदून ते भरून त्यात झाडे लावली. एका झोपडीच्या पडलेल्या भिंतीचे ६ थर बांधून विद्यार्थ्यांनी उभे केले. झोपडपट्टीसाठी महानगरपालिकेने बांधलेल्या अद्ययावत सार्वजनिक संडासाचा वापर शिबीर समारोपाच्या दिवसापासून सुरू झाला. बोर्डाकडून झोपडपट्टी, दिवा-बत्तीसाठी लोखंडी खांबेही येऊन पडले. कॉर्पोरेशनचे प्रशासक श्री. देवस्थळे व कलेक्टर श्री. जोसेफ यांनी या शिबीरास भेटी दिल्या. कुलगुरू बॅ. पी. जी. पाटील व प्राचार्या सौ. सुमतीबाई पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या शिबीराचे प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेचे संयोजक प्रा. पाटगावकर यांनी या कामाबद्दल मिळालेले ९०० चे मानधन कॉलेजला देणगी म्हणून अर्पण केले.

पुढील वर्षी या योजनेतर्फेच विद्यार्थी श्रम-शिबीर भरवून झोपडपट्टी शेजारून कदमवाडी ते रूईकर कॉलनी या जोड रस्त्याचे काम महापालिकेच्या सहकार्याने

विद्यार्थ्यानी केले. प्रा. खतीब यांनी या शिबीराचे प्रमुख म्हणून काम केले. चौकाक पुलाची-शिरोली, अतिग्रे ही खेडी दत्तक घेण्यात आली. विकासवाडी येथील महारोगी वसाहतीत पाझर तलाव खोदण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले. १९७९-८० मध्ये विदर्भ, गुजरात, राजस्थान पूरग्रस्तांना मदत पाठविण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी केले. १९८२-८३ मध्ये झोपडपट्टीत दारूबंदी, कुटुंब नियोजन, अल्पबचत व लहान मुलांना शाळेत पाठविण्याची मोहीम इ. कार्यक्रम पार पाडण्यात आले.[६७] १९८६ साली रूकडी येथे प्रा. सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनाखाली श्रमशिबीर घेण्यात आले. त्यामध्ये वृक्षारोपणासाठी खड्डे खोदले, रूकडी ते चोकाक ३ कि.मी. रस्ता मुरूम टाकून दुरूस्त केला.[६८]

१९७७-७८ या वर्षी या महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर हेर्ले (ता. हातकणंगले) येथे आयोजित करण्यात आले. या शिबीरामध्ये ग्रामसफाई, वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे, शेतकरी व शेतमजूरांचे सर्वेक्षण, स्त्री मुक्ती मार्गदर्शन करणे इ. प्रकल्प हाती घेण्यात आले. यावर्षी भारत सरकारने एन.एस.एस.चे मूल्यमापन केले. त्यामध्ये विद्यापीठामार्फत महाविद्यालयाची निवड झाली. पुढील विद्यार्थी विविध शिबीरात सहभागी झाले.

१. नेतृत्व शिबीर, मुंबई - कु. कल्पना पाटील, श्री महेश पाटील, महेंद्र जाधव व सतीश जाधव, उदय चौगुले.

२. राष्ट्रीय एकात्मता शिबीर, जालंदर (पंजाब कु. प्रतिभा पाटील, कु. सुनिता पाटील)

३. राष्ट्रीय एकात्मता शिबीर, चंदगड, प्रा. ए. ए. खतीब[६९]

१९८८-८९ या वर्षी सेवा योजनेअंतर्गत अतिग्रे, ता. हातकणंगले येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबीराचे उद्‌घाटन समारंभ मा.

सुभाषचंद्र भोसले, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या हस्ते व डॉ. भास्करराव पाटील, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य याच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या शिबीरामध्ये पाचशे मिटर लांबीच्या पाणंद रस्त्यावरती जवळच्या विहीरीवरील दोनशे ट्रेलर मुरूम आणून भरला. प्रा. एम. एस. मोहीते व प्रा. व्ही. आर. सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर पूर्ण झाले.[७०]

१९९२-९३ या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेतील कु. अश्विनी पाटील व कु. वर्षाराणी शिंदे या दोन विद्यार्थिनी, जयपूर (राजस्थान) येथे झालेल्या राजस्थान विद्यापीठाच्या 'महाराणी कॉलेज, जयपूर' यांच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये सहभागी झाल्या. भाई माधवराव विद्यापीठाच्या वतीने पन्हाळा येथे आयाजित करण्यात आलेल्या 'कार्यकर्ता प्रबोधन' शिबीरात श्री संपत पाटील व मोहन गावडे हे विद्यार्थी सहभागी झाले.[७१]

नैसर्गिक आपत्ती काळात अपादग्रस्तांना मदत करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. ३० सप्टेंबर, १९९३ रोजी लातूर जिल्ह्यामध्ये भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात प्राणहानी व वित्तहानी झाली. भूकंपग्रस्तांना मदत करण्यासाठी या योजनेतील विद्यार्थ्यांनी स्वतःमार्फत व महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमार्फत मदत गोळा करून भूकंपग्रस्तांना दिली.[७२]

२००५ साली कोल्हापूरला महापूराचा फटका बसला. अतिवृष्टी, महापूर या नैसर्गिक संकटाने कोल्हापूरचे जनजीवन विस्कळीत झाले होते. अशा प्रसंगी 'आपत्ती व्यवस्थापन'मधील स्वयंसेवकांनी पूरग्रस्तांना घरातील सामानसुमान हालविण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मोलाची मदत केली. त्याचप्रमाणे पूरग्रस्तांसाठी मदतनिधी गोळा करून त्यामधून गरीब लोकांना तांदूळ वाटप करण्यात आले.[७३]

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेला २००५ साली ३० वर्षे पूर्ण होत आहेत. या ३० वर्षांमध्ये या महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत समाजसेवेचे मूल्य जोपासले आहे. रयत शिक्षण संस्थेची स्थापना गरीब जनता सामान्य रयत समोर ठेवून केलेली आहे. हे धोरण समोर ठेवून महाविद्यालयाने झोपडपट्टी दत्तक योजना, खेडे विस्तार योजना, झोपडपट्टी परिसर स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मुलन, साक्षरता जागृती, वृक्षारोपण, पाणलोट क्षेत्र विकास, व्यसनमुक्ती, बालसुधारगृहात रक्षाबंधन, रक्तदान, पल्स पोलिओ लसीकरणामध्ये सहभाग, एड्स जनजागृती द्वारे स्वच्छता, सुरक्षा सप्ताह, इ. उपक्रम राबवून समाजाशी नाते घट्ट केले आहे. श्रमसंस्कार,समाजसेवा, समाजप्रबोधनाचे संस्कार महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांवर केले जातात.

प्रा. मारूतराव मोहीते, प्रा. वसंतराव सुर्यवंशी, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. व्ही. जे. वाढते, प्रा. पाटगावकर, प्रा. के. ए. खतीब, प्रा. मवारे, प्रा. दगडे, प्रा. के. एम. भोसले इ. प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयामध्ये यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. या योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व देशसेवेचे व्रत जोपासले जाते.

## २. प्रौढ व निरंतर शिक्षण योजना -

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पापैकी प्रौढ व निरंतर शिक्षण योजना ही महाविद्यालयामध्ये राबविली जाते.[७४] राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामार्फत चोकाक व अतिग्रे या दोन गावी एकूण ४ प्रौढ शिक्षण केंद्रे चालविण्यात आली. रयत शिक्षण संस्थेच्या तत्वानुसार ग्रामीण भाग या कार्यासाठी मुद्दाम निवडण्यात आला. अतिग्रे येथे स्त्रियांसाठी एक स्वतंत्र केंद्र चालविण्यात आले. या याजनेअंतर्गत लिहिणे, वाचणे, अंकज्ञान या

शिक्षणाबरोबरच अल्पबचत, कुटुंब कल्याण, आरोग्य या संबंधीचे विशेष ज्ञान देण्यात आले. सर्व जातीजमातीच्या प्रौढांमध्ये ऐक्यभावना वाढविण्यात आली.[७५]

**३. शाळासमूह योजना (शिक्षण संचालक, पुणे यांचेमार्फत) -**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये शाळासमूह योजना १९७६ पासून महाविद्यालयामध्ये राबविण्यात येत आहे. माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस हातभार लावणे, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या दूर करणे अशा विविध उद्देशाने ही योजना राबविण्यात आली. यामध्ये हेर्ले हायस्कूल, हेर्ले, कळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कळे, राजाराम हायस्कूल, बावडा, शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूल, महात्मा गांधी विद्यालय, रूकडी, दादासाहेब मगदूम हायस्कूल, काा सांगाव, श्री कडसिद्धेश्वर हायसूल, कणेरी इ. विविध शाळांमध्ये प्रत्येक वर्षी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी भेटी देवून तेथील विद्यार्थी व मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले.[७६]

**४. झोपडपट्टी दत्तक योजना/ खेडे दत्तक योजना -**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत खेडे दत्तक योजना राबविली जाते. विद्यापीठाची जरी खेडे दत्तक योजना असली तरी या महाविद्यालयाने खेड्यांऐवजी झोपडपट्टी दत्तक घेतली. झोपडपट्टी दत्तक घेणारे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय आहे. शाहू महाविद्यालयाचा परिसर झोपडपट्टयांनी वेढलेला आहे. या झोपडपट्टीतील रहिवासी आणि महाविद्यालय यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. कॉलेज जवळच कदमवाडीनजीक कावळा नाका येथ झोपडपट्टी आहे. ही झोपडपट्टी महाविद्यालयाने

दत्तक घेवून या योजनेनुसार महाविद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीयसेवा योजनेअंतर्गत झोपडपट्टीतील स्वच्छता, गटारसफाई, वृक्षारोपण, साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, मोफत आरोग्य तपासणी, आर्थिक सामाजिक सर्वेक्षण इ. उपक्रम वरचेवर घेण्यात येतात.[७७] तथापि सदर उपक्रमांना अपेक्षेएवढे यश मिळालेले नाही. व्यसन, अज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षणाबद्दलची उदासिनता, दारिद्र्यामुळे अल्पवयीन मुलांना शिक्षण सोडून कामाला पाठविण्याची वृत्ती इ. कारणांमुळे प्रतिसाद मिळण्यात अडचणी येतात. तथापि महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी निराश न होता आपले प्रबोधनाचे कार्य अखंडपणे चालवीत आहेत.

### ५. प्लॅनिंग फोरम -

प्लॅनिंग फोरम या योजनेची सुरूवात महाविद्यालयामध्ये १९६४-६५ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरू झाली. या वर्षी अर्थशास्त्र हा विषय तृतीय वर्ष बी.ए.साठी स्पेशल विषय म्हणून सुरू करण्यात आला म्हणून 'प्लॅनिंग फोरम अॅण्ड सोशल सायन्स असोसिएशन' ची स्थापना करण्यात आली. या विभागाचे उद्‌घाटन श्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांचे 'सहकार आणि नियोजन' या विषयावर व्याख्यान झाले.[७८] या योजनेमध्ये भारताच्या आर्थिक परिस्थितीबद्दल चिंतन/ विचारविनिमय केला जातो. त्यामध्ये अर्थशास्त्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने, चर्चासत्रे, पेपर वाचन इ. चे आयोजन केले जाते. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त अशी ही योजना महाविद्यालयामध्ये राबविली जात होती. सध्या महाविद्यालयामध्ये ही योजना सुरू नाही.

### ६. 'कमवा आणि शिका' योजना -

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे कर्मवीरआण्णांचे ब्रीदवाक्य आहे. हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये

केला जातो. 'कमवा आणि शिका' ही योजना महाविद्यालयामध्ये १९७१ साली सुरू झाली. १९७१ पासून आजपर्यंत ही योजना महाविद्यालयामध्ये सुरू आहे. श्रमयोजनेच्या तत्वानुसार लागेल अथवा पडेल ते काम करण्याची विद्यार्थ्यांची तयारी असते. या योजनेनुसार विद्यार्थी काम करत स्वतःचे शिक्षण पूर्ण करीत असतात. गरीब विद्यार्थ्यांसाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे.[७९] या योजनेबद्दल सविस्तर माहिती आपण पुढील प्रकरणात घेणार आहोत.

### ७. विद्यार्थी दत्तक योजना -

रयत शिक्षण संस्थेच्या धोरणानुसार १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयामध्ये 'विद्यार्थी दत्तक योजना' सुरू करण्यात आली. या योजनेनुसार वर्षभरात विद्यार्थी (पाल्य) व पालक (प्राध्यापक) यांच्या बैठका होतात. त्या बैठकामध्ये विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या जातात व महाविद्यालयाच्या कुवतीनुसार त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. विशेषतः ग्रंथालय सुविधा, लेडीज रूममधील सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या योजनेमुळे विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यामध्ये जवळीक निर्माण होण्यास मदत होते. त्यातून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी दूर करणे, त्यांना मार्गदर्शन करणे इ. बाबी साध्य होतात. विशेष म्हणजे आपल्या अडचणी महाविद्यालय, प्राचार्य व प्राध्यापक जाणून घेतात व त्या दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात ही भावना विद्यार्थी वर्गात या योजनेमुळे निर्माण होते.[८०]

### ८. गुणवत्ता सुधार प्रकल्प -

बारावीचे निकाल सुधारावेत यासाठी महाविद्यालयाने १९७७-७८ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयामध्ये गुणवत्ता वाढ प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पानुसार उन्हाळ्याच्या व दिवाळीच्या सुट्टीमध्ये ज्यादा तास घेऊन बारावीचा अभ्यासक्रम

लवकर पूर्ण करण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची उजळणी घेण्यासाठी वेळ मिळतो. विद्यार्थ्यांकडून बोर्डाच्या प्रत्येकी पाच पाच प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात येतात. आठवडा चाचणी, सत्र परीक्षा व पूर्व परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गेस्ट लेक्चर्स (तज्ज्ञ प्राध्यापकांची विषयानुसार व्याख्याने) आयोजित करण्यात येतात. याचा अनुकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या निकालावर होतो.[८१]

**९. विवेकवाहीनी व्यासपीठ -**

महाविद्यालयीन तरूणांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व बुद्धीप्रामाण्यवाद ह्यांचे संस्कार रूजावेत व त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी ह्या हेतूने महाविद्यालयामध्ये २००३ या शैक्षणिक वर्षापासून 'विवेकवाहिनी व्यासपीठ' हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. विद्यार्थी वेगवेगळया प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करून ते कार्यक्रम सादर करतात. या उपक्रमानुसार या कार्यक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी ह्यामध्ये विद्यार्थी स्वतः सहभागी होतात. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनापासून आभार प्रदर्शनापर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थीच पूर्ण पार पाडतात.[८२] विद्यार्थ्यांनी अशा जबाबदाऱ्या पार पाडल्यामुळे त्यांच्यामध्ये नियोजन, संघटन आणि भाषण करण्याच्या कौशल्यामध्ये वाढ होण्यास मदत होते. शिवाय महाविद्यालयाच्या उपक्रम व्यवस्थापनामधील आपण एक जबाबदार घटक आहोत याची जाणीव निर्माण होऊन आत्मविश्वास वाढण्यासाठी मदत झालेली आहे.

**१०. कर्मवीर विद्याप्रबोधिनी/ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन -**

रयत शिक्षण संस्थेद्वारे कर्मवीर विद्याप्रबोधिनी सामान्य ज्ञानाचा प्रसार करणारी ज्ञानशाखा संस्थेच्या विविध शाखांमध्ये कार्यरत आहे. महाविद्यालयामध्ये 'स्पर्धा

परीक्षा मार्गदर्शन/ कर्मवीर विद्याप्रबोधिनी' हा उपक्रम १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून सुरू आहे.[८३] या उपक्रमानुसार गणित, इंग्रजी, सामान्यज्ञान इ.च्या स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात. महाविद्यालयामध्ये कर्मवीर विद्या प्रबोधिनीमार्फत 'सामान्यज्ञान साधना' ही परीक्षा घेतली जाते. विद्यार्थ्यांसाठी दर रविवारी तज्ञ प्राध्यापकांच्या विषयवार तासिका आयोजित करून मार्गदर्शन करण्यात येते.[८४] कर्मवीर विद्याप्रबोधिनीमार्फत 'सामान्यज्ञान प्रमाणपत्र परीक्षा' घेण्यात येतात. यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक मार्गदर्शन करतात. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची तयारी होते.[८५]

## ११. वक्तृत्व स्पर्धा -

कोल्हापूरचे दानशूर उद्योगपती कै. वाय. पी. पोवार यांचे स्मरणार्थ श्री निवासराव पोवार यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयास वक्तृत्व स्पर्धेसाठी 'कै. वाय. पी. पोवार ढाल' स्नेहसंमेलनाचे पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू बॅ.पी. जी. पाटील यांचे शुभहस्ते अर्पण केली. १९७५-७६ पासून महाविद्यालयातर्फे 'आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात येतात. यशस्वी स्पर्धकास फिरती ढाल देण्यात येते. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर इतर अनेक महाविद्यालयीन स्पर्धक सहभागी होतात व या वक्तृत्व स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्या जातात.[८६]

## १२. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस विभाग -

'महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस आणि गाईडस्, मुंबई' तर्फे महाविद्यालयामध्ये २००५ पासून स्काऊटस गाईडस् युनिट सुरू केले आहे. 'रोव्हर रेंजर' ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील जगातील सर्व लोकशाही देशांमधून चालणारी चळवळ आहे. या चळवळीमध्ये विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करून चांगले नागरिक तयार करण्याचे अत्यंत उपयुक्त

शिक्षण दिले जाते. जेणेकरून भविष्यात ही मुले देशाचे चांगले नागरिक घडतील. यासाठी या महाविद्यालयातधील १६ ते २५ या वयोगटातील विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी रोव्हर रेंजर अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आला आहे.[८७]

**१३. ग्रामविस्तार योजना -**

१९८४-८५ व १९८५-८६ सालाकरिता विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयास ग्राम विस्तार ही योजना राबविण्याकरिता मान्यता दिली होती. त्यानुसार कागलजवळील विकासवाडी हे खेडे दत्तक घेतले हाते. विकासवाडी शेजारी कुष्ठरोगातून मुक्त झालेल्या लोकांची वसाहत होती. त्या वसाहतीत पाच घरे व त्यामध्ये २५ लहान मोठी माणसे रहात होती. शासनाकडून त्यांना ५० एकर जमीन मोफत मिळालेली होती.

या योजनेनुसार त्या ठिकाणी निरनिराळे कार्यक्रम घेऊन कॉलेजमधील विद्यार्थ्यांकडून विविध कामे करून घेतली. त्यामध्ये रस्ता दुरूस्त करणे, वृक्षारोपण करणे, कुष्ठरोगातून मुक्त झालेल्या लोकांच्या शेतात विविध प्रकारची कामे करणे, तेथे राहणाऱ्या लोकांना कपडे धुण्याकरिता आणि जनावरांना पाणी पिण्याकरिता एक बांध घालून त्या ठिकाणी पाण्याची सोय करण्यात आली. पावसाळ्यात या ठिकाणी पाणी साठून त्या पाण्याचा उपयोग वरीलप्रमाणे करता येईल. या योजनेसाठी प्रा. गरूड सर यांचे योग्य मार्गदर्शन लाभले.[८८]

**राष्ट्रीय छात्रसेना -**

'एकता व अनुशासन' हे राष्ट्रीय छात्रसेना दलाचे ब्रीद आहे. आज देशातील युवक युवतीच्या मनामध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे ही काळाची गरज झालेली आहे. ही राष्ट्रीय गरज नजरेसमोर ठेवून महाविद्यालयामध्ये स्थापनेपासून

आजपर्यंत राष्ट्रीय छात्रसेना विभाग कार्यरत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांच्यामध्ये राष्ट्रीय भावना व शिस्त निर्माण केली जाते. राष्ट्रीय छात्रसेना विभागातर्फे 'बी सर्टिफिकेट' व 'सी सर्टिफिकेट' परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये विद्यार्थी चांगले यश मिळवितात. या योजनेमधून लष्करी शिक्षणाबरोबरच समाजसेवेचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रूजविले जातात. वृक्षारोपन, अंधश्रद्धा निर्मूलन, पल्सपोलिओ मोहीम, एड्स जनजागृती, भ्रष्टाचार निर्मूलन मोहीम, पूरग्रस्तांसाठी आणि भूकंपग्रस्तांसाठी मदत इ. सामाजिक उपक्रमांमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी (राष्ट्रीय छात्रसेनेचे) मोठ्या संख्येने सहभागी होतात. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना या विभागाचा संख्यात्मक आलेख खालीलप्रमाणे देता येईल[८९] -

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९६७-६८ | २४ |
| १९६८-६९ | ७९ |
| १९६९-७० | – |
| १९७०-७१ | – |
| १९७१-७२ | १०५ |
| १९७२-७३ | ११० |
| १९७३-७४ | १४४ |
| १९७४-७५ | ८४ |
| १९७५-७६ | ६३ |
| १९७६-७७ | ८२ |
| १९७७-७८ | ५३ |
| १९७८-७९ | ५८ |
| १९७९-८० | ५८ |
| १९८०-८१ | ५३ |

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९८१-८२ | ५३ |
| १९८२-८३ | ५३ |
| १९८३-८४ | ५३ |
| १९८४-८५ | - |
| १९८५-८६ | ५३ |
| १९८६-८७ | - |
| १९८७-८८ | ५३ |
| १९८८-८९ | ५३ |
| १९८९-९० | ५३ |
| १९९०-९१ | ५३ |
| १९९१-९२ | ५३ |
| १९९२-९३ | ५३ |
| १९९३-९४ | ५३ |
| १९९४-९५ | ५३ |
| १९९५-९६ | ३३ |
| १९९६-९७ | ५३ |
| १९९७-९८ | ५३ |
| १९९८-२००५ | ५३ |

**राष्ट्रीय छात्रसेना विभागातील विद्यार्थ्यांचे यश -**

१. १७ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २००२ मध्ये दिल्ली येथे झालेल्या आर.डी. कॅम्पमध्ये सिनिअर अंडर ऑफिसर विश्वास पवार याने शुटींगमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.[१०]

२. कार्पोरल के. एन. गावडे, कार्पोरल एस. डी. मोलाने, कॅडेट अे. पी. वाघमोडे व कॅडेट अे. वाय. गाडे यांची नवी दिल्लीतील जानेवारी १९८७ च्या प्रजासत्ताक दिन

परेड संचलनातील आर्मी इन्व्हेंटसाठी बटालियन स्तरावर महाविद्यालयातील वरील विद्यार्थ्यांची निवड झाली.[११]

३. उन्हाळ्याच्या सुट्टीत काश्मिरमध्ये झालेल्या अखिल भारतीय पातळीवरील 'वॉटर स्की' कॅम्पसाठी मिनी अंडर ऑफिसर संपतराव मोलान यांची निवड झाली होती.

ऑक्टोबर १९८७ मध्ये दिल्ली येथे झालेल्या 'आर. डी. बॅनर ८८' करिता आर्मी इव्हेंटमधून 'बायोनेट फायटींग' करिता महाराष्ट्राच्या चमूत संपत मोलाणे याची निवड झाली. त्यान 'बायोनेट फायटिंग' वैयक्तिक स्पर्धेत अखिल भारतीय पातळीवर प्रथम क्रमांक तसेच टीम इव्हेंटमध्येही प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. त्यांचा या बहुमोल कामगिरीमुळे आपले महाराष्ट्र कॉंटीनंट १९८७ साली आम्ही इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. ही बाब महाविद्यालयास भूषणावह आहे.[१२]

उन्हाळाच्या सुट्टीत काश्मिरमध्ये झालेल्या अखिल भारतीय पातळीवरील 'ट्रेकिंग कॅम्पसाठी' सार्जंट धनंजय खटावकर याची निवड झाली होती. प्रजासत्ताक दिन परेड, नवी दिल्ली १९८९ करिता अंडर ऑफिसर मोहन पाटील याची 'क्रॉस कंट्री' इव्हेंटमधून तर अंडर ऑफिसर उदय झावरे याची जनरल कॅडेट म्हणून निवड झाली.[१३]

अखिल भारतीय पातळीवर दार्जिलिंग येथे नोव्हेंबर १९९० मध्ये झालेल्या 'ॲडव्हान्स लिडरशिप वुइथ रॉक क्लाईम्बींग कॅंप' साठी अंडर ऑफिसर शंतनु भगरे याची राज्य पातळीवर निवड झाली हाती.[१४]

डिसेंबर १९९८ मध्ये मडगाव येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील समुद्र ते आकाश ट्रेक ह्या ट्रेकिंग कॅम्पसाठी महाविद्यालयातून कंपनी सार्जंट मेजर बाळासाहेब नागराळे व अंडर ऑफिसर फिरोजखान नाईकवाडे यांची निवड झाली.

ऑक्टोबर १९९८ मध्ये बारदाळ येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी महाविद्यालयातून अंडर ऑफिसर फिरोजखान नाईकवाडे व कॅडेट उमेश नवाळे यांची निवड झाली.[९५]

म्हैसूर येथे झालेल्या अखिल भारतीय पातळीवरील राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी सार्जंट विनोदकुमार कांबळे व कार्पोरल किशोर शिनगारे यांची निवड झाली.[९६]

राष्ट्रीय छात्रसेना हा महाविद्यालयातील एक अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. या विभागामध्ये विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त, देशप्रेम इ. गुणांचा विकास केला जातो. त्याचबरोबर समाजसेवेचे संस्कारही केले जातात. या महाविद्यालयातील एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी अपातग्रस्तांना मदत, पल्स पोलीओ, एड्स जनजागृती, रक्तदार, भ्रष्टाचार निर्मुलन मोहीम, वृक्षारोपण इ. विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन समाजसेवेचे आपले कर्तव्य पार पाडले आहे. छात्रसेनेच्या या सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयीन एन.सी.सी. प्रमुख प्राध्यापकांचे, प्राचार्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. महाविद्यालयातील या विभागाचे प्रमुख म्हणून प्रा. भोसले पी.ए. (१९६७), प्रा. चव्हाण एस.ए. (१९७१), प्रा. एच. जी. साळुंखे (१९७२-१९८०), प्रा. एम. जी. वाली (१९८०-१९८४), प्रा. टी. एच. निकम (१९८५-८६), कॅप्टन रघुनाथराव गायकवाड (१९८७-९७), कॅप्टन अनिल उबाळे (१९९८-२००५) यांनी कार्यभार सांभाळला.[९७]

**ग्रंथालय -**

ज्ञानसाधनेच्या दृष्टीने महाविद्यालयात ग्रंथालयास अतिशय महत्त्वाचे स्थान असते. विद्यार्थी, प्राध्यापक यांना सखोल ज्ञान मिळण्याच्या दृष्टीने ग्रंथालय समृद्ध व सुसज्ज असणे आवश्यक असते. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी

सुसज्ज अशी दोनमजली इमारत आहे. या इमारतीमध्ये प्राध्यापक, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी रिडींगची सोय आहे. ग्रंथालयामध्ये हजारो पुस्तके आहेत. नियतकालिके, दैनिके घेतली जातात. ग्रंथालयामार्फत बुक बँक ही योजना राबविली जाते. या योजनेतून गरीब, होतकरू, खेळाडू, अपंग विद्यार्थी यांना पुस्तके दिली जातात. ग्रंथालयामध्ये प्रत्येक वर्षी नवीन संदर्भ ग्रंथांची भर घातली जाते. ग्रंथालयातील प्रत्येक वर्षीच्या पुस्तक संख्येचा आढावा पुढीलप्रमाणे[१८] -

| वर्ष | पुस्तकांची सख्या | मासिकांची संख्या |
|---|---|---|
| १९७०-७१ | ९९०९ | ३० |
| १९७१-७२ | ११,३४८ | ३० |
| १९७२-७३ | १७,१९३ | २० |
| १९७३-७४ | १८,४२४ | २५ |
| १९७४-७५ | २१,७५६ | २० |
| १९७५-७६ | २१,७५६ | २० |
| १९७६-७७ | – | ३० |
| १९७७-७८ | २५,६०८ | ३० |
| १९७८-७९ | ३१,३८३ | ४२ |
| १९७९-८० | ३३,६५९ | ३० |
| १९८०-८१ | ३५,९०० | ४० |
| १९८१-८२ | – | ६० |
| १९८२-८३ | ४०,०३९ | ६९ |
| १९८३-८४ | ४०,०३९ | ६९ |
| १९८४-८५ | – | – |
| १९८५-८६ | ४४,३६४ | ७९ |
| १९८६-८७ | ४६,८२७ | ८१ |

| वर्ष | पुस्तकांची सख्या | मासिकांची संख्या |
|---|---|---|
| १९८७-८८ | – | – |
| १९८८-८९ | – | – |
| १९८९-९० | – | ६५ |
| १९९०-९१ | ५०,००० | – |
| १९९१-९२ | ५०,००० | ५० |
| १९९२-९३ | ५१,००० | ४५ |
| १९९३-९४ | ५१,५०६ | ४५ |
| १९९४-९५ | – | – |
| १९९५-९६ | ५३,१५६ | ३५ |
| १९९६-९७ | ५३,९३६ | ३५ |
| १९९७-९८ | ५४,७३६ | ३५ |
| १९९८-९९ | ५७,२१३ | ४३ |
| १९९९-२००० | ६१,४६९ | ३० |
| २०००-०१ | ६२,००० | ३० |
| २००१-०२ | ४१,८३० | ३१ |
| २००२-०३ | ४२,६०० | ३१ |
| २००३-०४ | ६४,२०७ | ३६ |
| २००४-०५ | ६४,७३८ | ४० |
| २००५-०६ | ६५,८९५ | ४० |

**इमारत बांधकाम -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय सुरूवातीला 'किर्ती कॉलेज' या नावाने सुरू हाते. १९६७ साली किर्ती कॉलेज रयत शिक्षण संस्थेकडे हस्तांतरीत झाले. १९६१ ते १९६९ पर्यंत किर्ती कॉलेज ताराराणी विद्यापीठाच्या जुन्या इमारतीतच चालू होते. १९६९ ते १९७१ ही दोन वर्षे महाविद्यालय प्रिन्स शिवाजी बोर्डीगच्या महाराष्ट्र

हायस्कूलच्या शिवाजी पेठेतील इमारतीत सुरू होते. जून १९७१ पासून महाविद्यालय कदमवाडी रस्त्यालगत कावळ्यानाक्याजवळ स्वतःच्या इमारतीमध्ये कायमस्वरूपी सुरू झाले.[९९]

महाविद्यालयास स्वतःच्या जागेची अतिशय आवश्यकता होती. ही आवश्यकता लक्षात घेवून त्यावेळचे महसूलमंत्री मा.ना. बाळासाहेब देसाई आणि मा. एन.डी. पाटील यांनी महाविद्यालयाला तीन एकर जागा मिळवून दिली.[१००] मा. बाळासाहेब देसाई यांच्या शुभहस्ते सरकारकडून मिळालेल्या जागेवर इमारतीचा भूमिपूजन समारंभ दि. २२-२-१९६९ रोजी झाला. दि. २६-२-१९६९ रोजी ठराव करून संस्थेच्या सर्व शाखांतील सर्व सेवकांचे दोन दिवसांचे वेतन महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी दिले. या महाविद्यालयामध्ये असलेल्या सर्व स्टाफनेही आपल्या महिनाभराचा संपूर्ण पगार इमारतीसाठी दिला. कॉलेजची वास्तू मे १९७१ मध्ये उभी राहिली. या इमारतीचे कॉन्ट्रॅक्ट कराडच्या कोटणीस यांच्या न्यूट्रीओ बिल्डर्सनी घेतले होते.[१०१]

महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी दिवसरात्र परिश्रम घेतले. प्रसंगी गवंडी, सुतारांच्या हाताखाली काम केले. स्लॅब टाकत असताना पाट्या वाहिल्या. रजा, सुट्टया या काळातही सेवा बजावली. काम करीत असताना शिपाई, अधीक्षक असे दर्जे पाहिले नाहीत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक आजारपण इ. संवेदनशील प्रसंगी एकमेकांना सहकार्य केले.

कर्मचारी वर्गाने आजवर केलेल्या संपूर्ण श्रमदानाची किंमत काढली तर एक लाख रूपयांच्यावर जाईल. या श्रमदान कार्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो शिपाई भोसले एम.बी., सणस. ए. एम., तरंगे. पी. जे., सिताप, मोमीन, दुर्गूळे यांनी केलेल्या श्रमदानाचे मूल्यमापन रूपयांच्या किंमतीत केले तर अंदाजे रूपये ६०,००० पेक्षा अधिक होईल. शिपाई फल्ले. के. पी. याने संपूर्ण इमारतीचे लाईट

फिटींगचे काम केले. के. पी. यादव, बी. डी. पाटील, काळे बी. आर., निकम व्ही. एस., देवडकर बी. बी., चव्हाण. पी. डी., सौंदीकर, इ. कार्यालयीन प्रशासकीय कर्मचारी यांचे इमारत उभी करण्यामध्ये मोलाचे योगदान आहे. अधीक्षक काकडे यांचे योगदानही मोठे आहे. इमारत बांधकामासाठी आवश्यक अनुदान मिळविणे, प्लॅन एस्टीमेटस् इ. तयार करून घेणे, प्रत्यक्ष बांधकामावर सतत जातीने देखरेख करणे, शारीरिक कष्टाची कामे रात्री दोन वाजेपर्यंत करणे इ. कामे जबाबदारीपूर्वक त्यांनी पार पाडली.[१०२]

महाविद्यालयाच्या इमारत बांधकामामध्ये १९७१ साली मुख्य इमारतीच्या तळमजल्याच्या आठ खोल्या, प्राचार्य निवास, मुलांच्या वसतीगृहाचा तळमजला याचे बांधकाम झाले होते.

१९७५-७७ या काळामध्ये कॅन्टीन बिल्डींग बांधली गेली. १९८१-८२ या काळामध्ये कॉलेजच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या आठ खोल्याचे बांधकाम पूर्ण झाले.[१०३] १९८३-८४ या काळामध्ये दुसऱ्या मजल्यावरील हॉल, ग्रंथालयाचे ४ हॉल, कॅन्टीन शेजारील मेस हॉल, प्राचार्यांचे केबीन व प्राध्यापकांसाठी स्टाफरूम इ. बांधकाम पूर्ण झाले.[१०४]

१९८५-८९ या काळामध्ये महाविद्यालयात स्टेज व पंप हाऊस बांधले गेले.

१९९०-९१ या काळात इमारतीचे रंगकाम करण्यात आले.[१०५]

१९९७-९८ या काळात ग्रंथालयाची नवीन इमारत बांधली गेली.[१०६]

दुसऱ्या मजल्याचे ३०,४९,००० बजेट आहे. सध्या महाविद्यालयाचा कॅम्पस एरिया ९.२० एकर आहे. सध्या महाविद्यालयामध्ये खालील इमारती आहेत[१०७] -

१. महाविद्यालयाची मुख्य इमारत

२. विद्यार्थी वसतिगृह

३. विद्यार्थिनी वसतिगृह

४. ग्रंथालय

५. संगणक कक्ष

६. प्राचार्य निवास

७. जिमखाना

८. सांस्कृतिक हॉल

९. एम.सी.व्ही.सी. इमारत

१०. कॅन्टीन

११. प्रसाधनगृह (चेंजिंग रूम)

१२. पम्प हाऊस

**जातिनिहाय विद्यार्थी संख्या -**

मागासलेल्या वर्गामध्ये शिक्षणाची अभिरूची उत्पन्न करून अत्यंत गरीब विद्यार्थ्यास मोफत शिक्षण देणे यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. समाजातील उपेक्षित वर्गापर्यंत ज्ञानगंगा नेण्याचा कर्मवीर भाऊराव यांचा हा वसा महाविद्यालय निष्ठापूर्वक सांभाळीत आहे. या महाविद्यालयातून मागासलेल्या दलित व उपेक्षित अशा विद्यार्थी-विद्यार्थिनींचा विकास केला जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी वर्गापैकी स्थूलमानाने ६५% विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील (इ.बी.सी.) आहेत. २२% विद्यार्थी मागासलेल्या जातीचे आहेत. तर ३% विद्यार्थी मागासलेल्या जमातींचे आहेत. १०% विद्यार्थी महाविद्यालयीन फी भरू शकणारे आहेत.[१०८] हे प्रमाण पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.[१०९]

## जातीनिहाय विद्यार्थी संख्या 2004–05

| Class | Non Backward | | SC | | ST | | NT | | Vimukta Jatis | | Neo-Buddhist | | Other Backward Class | | Total Backward Class | | Total | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | B | G | B | G | B | G | B | G | B | G | B | G | B | G | B | G | B | G | |
| XI Arts | 67 | 26 | 53 | 17 | - | - | 13 | 2 | - | - | - | - | 15 | 4 | 81 | 23 | 148 | 49 | 197 |
| XI Com | 49 | 9 | 21 | 3 | - | - | 4 | 1 | - | - | - | - | 8 | 1 | 33 | 5 | 82 | 14 | 96 |
| XII Sci | 60 | 15 | 10 | 7 | | - | 5 | 2 | - | - | - | - | 5 | 2 | 20 | 11 | 78 | 26 | 104 |
| XII Arts | 83 | 23 | 45 | 20 | 1 | - | 18 | 4 | - | - | - | - | 11 | 3 | 75 | 27 | 158 | 50 | 208 |
| XII Com | 68 | 14 | 11 | 4 | - | - | 7 | 4 | - | - | - | - | 6 | 1 | 24 | 9 | 92 | 21 | 113 |
| XII Sci | 35 | 10 | 12 | 5 | - | - | 1 | 5 | - | - | - | - | 8 | 2 | 21 | 12 | 58 | 21 | 79 |
| B.A.I | 92 | 17 | 58 | 10 | 0 | 1 | 13 | 6 | - | - | - | - | 11 | 1 | 82 | 18 | 174 | 35 | 209 |
| B.A.II | 41 | 6 | 26 | 11 | - | - | 11 | 4 | - | - | - | - | 9 | 4 | 46 | 19 | 87 | 25 | 112 |
| B.A.III | 63 | 23 | 32 | 6 | - | - | 7 | 3 | - | - | - | - | 7 | - | 46 | 9 | 109 | 32 | 141 |
| B.Com.I | 37 | 14 | 14 | 1 | 1 | - | 6 | - | - | - | - | - | 4 | 1 | 25 | 2 | 62 | 16 | 78 |
| B.Com. II | 17 | 6 | 9 | 4 | - | - | 3 | - | - | - | - | - | 3 | - | 15 | 4 | 32 | 10 | 42 |
| B.Com. III | 15 | 3 | 7 | 3 | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 2 | 8 | 5 | 23 | 8 | 31 |
| B.Sc.I | 28 | 12 | 9 | 4 | - | - | 4 | 2 | - | - | - | - | 4 | 2 | 17 | 8 | 45 | 20 | 65 |
| B.Sc. II | 8 | 0 | 1 | - | - | - | 2 | - | - | - | - | - | - | 2 | 3 | 2 | 11 | 2 | 13 |
| B.Sc. III | 3 | 1 | 3 | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 6 | 3 | 9 |
| **Total** | 555 | 179 | 311 | 96 | 3 | 1 | 92 | 31 | - | - | - | - | 92 | 26 | 496 | 154 | 1165 | 332 | 1497 |

## विषयानुसार विद्यार्थी संख्या

सन २००१-०२ साली खालीलप्रमाणे विषयानुसार विद्यार्थी संख्या महाविद्यालयामध्ये होती.[११०]

| विषय | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|
| | बी.ए. १ | बी.ए. २ | बी.ए.भाग ३ |
| १. मराठी | २२४ | ३४ | ८ |
| २. हिंदी | ७० | २५ | ६ |
| आवश्यक हिंदी | १५ | | |
| ३. इंग्रजी | १८ | १४ | ९ |
| ४. अर्थशास्त्र | ५५ | ३८ | १४ |
| ५. भूगोल | १७३ | ३३ | ८ |
| | | आयडीएस १५ | |
| ६. इतिहास | १७५ | ४० | ९ |
| ७. समाजशास्त्र | १३५ | ३२ | १२ |
| ८. शारीरिक शिक्षण | ८० | २७ | १२ |
| ९. ॲडव्हान्स अकौन्टन्सी | १०१ | ३५ | २० |
| १०. ॲडव्हान्स बँकिंग ॲण्ड फायनान्स | - | - | ५ |
| ११. केमिस्ट्री | ६३ | २१ | १० |

**महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या**[१११]

| क्र. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या | विद्यार्थिनी संख्या | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९६७-६८ | - | - | २४७ |
| २. | १९६८-६९ | – | – | ३१५ |
| ३. | १९६९-७० | – | – | ५६० |
| ४. | १९७०-७१ | – | – | ७०० |
| ५. | १९७१-७२ | – | – | ७२० |
| ६. | १९७२-७३ | – | – | ७८० |
| ७. | १९७३-७४ | – | – | ८८६ |
| ८. | १९७४-७५ | - | - | १०९० |
| ९. | १९७५-७६ | – | – | – |
| १०. | १९७६-७७ | – | – | ९७५ |
| ११. | १९७७-७८ | – | – | ९८६ |
| १२. | १९७८-७९ | – | – | ८७७ |
| १३. | १९७९-८० | – | – | ९०९ |
| १४. | १९८०-८१ | – | – | १००६ |
| १५. | १९८१-८२ | ८९० | १४ | १०३८ |
| १६. | १९८२-८३ | ८९० | १५९ | १०४९ |
| १७. | १९८३-८४ | ९४३ | १५३ | १०९६ |
| १८. | १९८४-८५ | ८६५ | १२० | ९८५ |
| १९. | १९८५-८६ | ८९९ | ७७ | ९७६ |
| २०. | १९८६-८७ | ९५३ | ७८ | १०३० |
| २१. | १९८७-८८ | ९६५ | ७२ | १०३७ |
| २२. | १९८८-८९ | १००९ | १०१ | १११० |
| २३. | १९८९-९० | १२०१ | १२९ | १३३० |
| २४. | १९९०-९१ | १३८६ | १४७ | १५२७ |

| क्र. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थी संख्या | विद्यार्थिनी संख्या | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| २५. | १९९१-९२ | १२६५ | १६५ | १४३० |
| २६. | १९९२-९३ | १२१६ | २१८ | १४३५ |
| २७. | १९९३-९४ | ११२८ | २०८ | १३३६ |
| २८. | १९९४-९५ | ११०८ | २११ | १३१९ |
| २९. | १९९५-९६ | १०१७ | १९९ | १२१६ |
| ३०. | १९९६-९७ | ९८१ | २२३ | १२०४ |
| ३१. | १९९७-९८ | ८१४ | २३६ | १०५० |
| ३२. | १९९८-९९ | ८७८ | २१९ | १०९७ |
| ३३. | १९९९-२००० | ११२ | २७५ | १४३७ |
| ३४. | २०००-२००१ | १२९२ | ३१६ | १६०८ |
| ३५. | २००१-०२ | १२५४ | ३४५ | १५९९ |
| ३६. | २००२-०३ | ११७६ | ३३० | १५०६ |
| ३७. | २००३-०४ | १२४२ | ३५५ | १५९७ |
| ३८. | २००४-०५ | ११६५ | ३३२ | १४९७ |
| ३९. | २००५-०६ | १४६२ | ३५९ | १४६२[११३] |

१९६८-६९ या शैक्षणिक वर्षापासूनच्या विद्यार्थी संख्येच्या तक्त्यावरून असे दिसून येते की, काही संख्यात्मक चढउतार वगळता विद्यार्थी संख्या सतत वाढतीच राहिली आहे. कोल्हापूरसारख्या विद्यापीठ असलेल्या शहरामध्ये रयतेचे महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय किती योग्य होता हेच यावरून दिसून येते. तत्कालीन शहराच्या गजबजाटापासून अलिप्त असलेली जागा आणि आजूबाजूची गलिच्छ वस्ती या अडथळ्यांना न घाबरता संस्था आणि महाविद्यालयाच्या प्रशासनाने संख्यात्मक वाढ घडविण्यात यश मिळविले असे दिसून येते.

## संदर्भ सूची


१. वार्षिक नियतकालिक- किर्ती कॉलेज (१९६४-६५), पृ. २.

२. कित्ता, पृ. क्र.२.

३. कित्ता, पृ. क्र.२.

४. वार्षिक नियतकालिक- राजर्षी (१९७५-७६).

५. पवार बा. ग., 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटील', मातृभूमी प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. क्र.३६८, ३६९.

६. पवार बा. ग., पृ. क्र. ३७३, ३७४.

७. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी' अंक ४१ वा (२००५-२००६), पृ. क्र. ११४.

८. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९६७ ते २००५.

९. वार्षिक नियतकालिक 'राजर्षी' अंक १२ वा (१९७५-७६).

१०. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', अंक १३ वा (१९७६-७७).

११. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', (१९८५-८६).

१२. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', (१९८९-९०).

१३. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', (२००४-०५),पृ. क्र.९८.

१४. 'राजर्षी' विज्ञानशाखा स्मरणिका १९९४-९५.

१५. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९५-९६.

१६. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००४-०५, पृ. क्र. १०२.

१७. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००३-०४, पृ. क्र. १०२.

१८. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००४-०५, पृ. क्र. १०३.

१९. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००५-०६, पृ. क्र. १०४.

२०. कित्ता, पृ. क्र. ९५.

२१. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७८-८९.

२२. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८७-८८.

२३. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९८-९९.

२४. उपरोक्त, २००५-०६, पृ. क्र. ८५.

२५. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००२-०३, पृ. क्र. ८९.

२६. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २०००-०१, पृ. क्र. ४८.

२७. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००५-०६, पृ. क्र. ८०.

२८. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', २००२-०३, पृ. क्र. ८५-८६.

२९. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८१-८२.

३०. उपरोक्त, २००४-०५, पृ. क्र. ८७.

३१. उपरोक्त वार्षिक नियतकालिक २००५-०६, पृ. क्र. ८१.

३२. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७०-७१.

३३. उपरोक्त, १९७८-७९.

३४. उपरोक्त, १९८१-८२.

३५. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८८-८९.

३६. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९९-२०००.

३७. उपरोक्त, २००५-०६, पृ. क्र. ६.

३८. उपरोक्त, २०००-०१.

३९. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९७-९८, पृ. क्र. ४१.

४०. उपरोक्त, १९७५-७६.

४१. उपरोक्त, १९९८-९९, पृ. क्र. ४१.

४२. उपरोक्त, २००२-०३, पृ. क्र. ८५.

४३. उपरोक्त, १९७०-७१.

४४. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७२-९३.

४५. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७३-७४.

४६. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७४-७५.

४७. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९७७.

४८. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८३-८४.

४९. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८७-८८.

५०. उपरोक्त १९८९-९०.

५१. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९१-९२.

५२. उपरोक्त, १९९५-९६.

५३. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९२-९३, पृ. क्र. ६.

५४. उपरोक्त १९९८-९९.

५५. उपरोक्त २०००-०१.

५६. उपरोक्त २००२-०३.

५७. उपरोक्त २००३-०४, पृ. क्र. ७४, ७५.

५८. उपरोक्त २००४-०५, पृ. क्र. ८८.

५९. उपरोक्त २००४-०५, पृ. क्र. ९८.

६०. उपरोक्त २००२-०३, पृ. क्र. ९३.

६१. मुलाखत - बारवाडे जे. एम., ज्यु. क्लर्क, दि. १-१०-२००९.

६२. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९०-९१, पृ. क्र. ५.

६३. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी' व मुलाखत - जे.पी. देशमुख, लायब्ररी क्लर्क दि. ५-१०-२००८.

६४. मुलाखत - जे. पी. देशमुख व १९७० ते २००५-०६ पर्यंतचे 'राजर्षी' वार्षिक नियतकालिक (५-१०-२००८).

६५. उपरोक्त १९७५-७६.

६६. उपरोक्त रौप्य महोत्सवी स्मरणिका (१९८६-८७) - प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

६७. कित्ता - प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

६८. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९८६-८७.

६९. वार्षिक नियतकालिक, उपरोक्त १९८७-८८.

७०. वार्षिक नियतकालिक, उपरोक्त १९८८-८९.

७१. उपरोक्त १९९२-९३, पृ. क्र. ५.

७२. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी',१९९३-९४, पृ. क्र. ५.

७३. उपरोक्त २००५-०६, पृ. क्र. ८६.

७४. उपरोक्त १९८७-८८, पृ. क्र. ७.

७५. उपरोक्त १९८६-८७.

७६. कित्ता.

७७. उपरोक्त, १९७५-७६.

७८. उपरोक्त, १९६४-६५.

७९. उपरोक्त, १९७२-७३.

८०. उपरोक्त, १९९३-९४, पृ. १०.

८१. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी', १९९७-९८, पृ. क्र. ३८.

८२. उपरोक्त, २००३-०४, पृ. क्र. ८५.

८३. उपरोक्त, १९८९-९०.

८४. उपरोक्त, १९९७-९८, पृ. क्र. ३८.

८५. उपरोक्त, २००२-०३, पृ. क्र. ८५.

८६. उपरोक्त, १९७४-७५.

८७. उपरोक्त, २००५-०६, पृ. क्र. ९६.

८८. उपरोक्त, १९८५-८६.

८९. वार्षिक नियतकालिक - 'राजर्षी' (१९६४ ते २००५-०६).

९०. उपरोक्त, २००२-०३, पृ. क्र. ९५.

९१. उपरोक्त, १९८५-८६.

९२. उपरोक्त, १९८७-८८.

९३. उपरोक्त, १९८८-८९, पृ. क्र. ६.

९४. उपरोक्त, १९९०-९१, पृ. क्र. २.

९५. उपरोक्त, १९९८-९९.

९६. उपरोक्त, २००३-०४, पृ. क्र. ६.

९७. वार्षिक नियतकालीक, 'राजषी', १९६७-१९६८ ते २००५-२००६.

९८. देशमुख. जे. पी. मुलाखत व 'राजर्षी' वार्षिक नियतकालिक १९७०-७१ ते २००५-०६.

९९. पाटगावकर. प्रा. चंद्रकांत, रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), उपरोक्त.

१००. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर. लेख - राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय ही आण्णाची स्वप्नपूर्ती, श्री. बी.बी. पाटील.

१०१. पाटगावकर. प्रा. चंद्रकांत, रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), उपरोक्त.

१०२. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, लेख - 'आमची पंचवीस वर्षाची वाटचाल' भाग - दोन, सामाजिक-सांस्कृतिक, प्रा. श्याम येडेकर.

१०३. स्मरणिका - 'राजर्षी', विज्ञान शाखा (१९९४-९५), लेख - महाविद्यालयाची वाटचाल : स्मृतीची चालता पाने... प्रा. रामराव पाटील, नारायण पाटोळे.

१०४. राजर्षी रौप्य महोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), प्राचार्य डॉ. एस.आर. सुर्यवंशी.

१०५. उपरोक्त, १९९०-९१.

१०६. उपरोक्त, १९९७-९८.

१०७. नॅक अहवाल, २००३-०४, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, भाग-१, पृ. क्र. ४२, ४३, ४४.

१०८. वार्षिक नियतकालिक, 'राजर्षी', १९७५-१९७६.

१०९. कार्यालयीन दफ्तर.

११०. नॅक अहवाल २००३-०४, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, भाग -२.

१११. कार्यालयीन दफ्तर.

❑❑❑